अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि.१ मे २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २१२ वा किंमत : ५ रुपये | पाने ८




आयपीएल सामना क्र.४३




लखनौ सुपर जाएंट्स विरुद्ध बँगलूर रॉयल चालेंजर्स

वेळ : सायं.७.३० वा.

स्थळ : एकाना आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, लखनऊ

# बाजार समितीत कल्याणशेट्टींची घोडदौड, अक्कलकोटला मिळाली दुधनीची जोड

## अप्पांनी राखला गड, अण्णांची झाली पडझड

सुराज्य/अक्कलकोट

**महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील दुधनी म्हणजे काँग्रेसचे ज्येष्ठनेते माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांचा अभेद्य गड. त्यांनीच स्थापन केलेल्या बाजार समितीवर स्थापनेपासून त्यांचीच सत्ता. याच सत्तेसाठी झालेल्या निवडणुकीत म्हेत्रेंची त्यांच्याच बालेकिल्ल्यात पडझड झाली असून भाजपचे आ.सचिन कल्याणशेट्टी यांनी जोरदार मुसंडी मारली आहे. अक्कलकोट बाजार समितीमध्ये भाजपचे माजी आ. सिद्रामप्पा पाटील यांचीच सत्ता होती. ती कायम ठेवत कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोटला दुधनीचीही जोड देत स्वत:ची विजयी घोडदौड कायम असल्याचे दाखवून दिले आहे.**

या दोन्ही बाजार समित्यांसाठी रविवारी मतदान झाल्यानंतर लगेचच मतमोजणीला सुरूवात झाली. अक्कलकोट बाजार समितीमधील सत्ता कायम ठेवण्यासाठी भाजचपे सिद्रामप्पा पाटील आणि सचिन कल्याणशेट्टी या माजी-आजी आमदारांनी कंबर कसली होती. याठिकाणी काँग्रेसचे माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांनी भाजपमधील नाराज गटाला घेवून आघाडी करत आव्हान दिले होते. दुसरीकडे दुधनी बाजार समिती स्थापनेपासून म्हेत्रे यांच्या ताब्यात होती. अक्कलकोट बाजार समितीध्ये म्हेत्रे यांनी आव्हान दिल्यामुळे कल्याणशेट्टी-पाटील या आजी-माजी आमदारांनी म्हेत्रे यांचा पराभव करण्यासाठी दुधनीमध्ये प्रचंड जोर लावला. अत्यंत अटीतटीच्या या निवडणुकीत कल्याणशेट्टी-पाटील यांनी अक्कलकोट बाजार समितीवरील सत्ता तर कायम राखलीच. शिवाय दुधनीतही अनपेक्षीतपणे सत्ता काबिज करत अक्कलकोटच्या विजयाला जोड दिली आहे.

अक्कलकोट मार्केट कमिटीत एकूण १८ जागांवर ४२ उमेदवार तर दुधनी बाजार समितीत १८ जागांपैकी दोन जागा बिनविरोध तर उर्वरित १६ जागांसाठी ३२ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. अतिशय चुरशीने झालेल्या निवडणुकीत आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि माजी आमदार सिद्रामप्पा पाटील गटाचे उमेदवार विजयी झाले. या आजी-माजी आमदारांमधील लढत अतिशय रंगतदार ठरल्याने संपूर्ण सोलापूर जिल्ह्याचे लक्ष या निवडणुकीकडे लागले होते. माजी आमदार सिध्दाराम म्हेत्रे गटाला अक्कलकोट व दुधनी मार्केट कमिटीत प्रत्येकी ६ जागांवर समाधान मानावे लागले.

**पिता-पुत्रांचे यश-अपयश**

दुधनी मार्केट कमिटीचे सभापती प्रथमेश म्हेत्रे व माजी सभापती शंकर म्हेत्रे या पिता-पुत्रांचा या निवडणुकीत दारुण पराभव झाला. अक्कलकोट मार्केट कमिटी निवडणुकीत माजी आमदार सिद्रामप्पा पाटील व संजीवकुमार पाटील या पिता-पुत्रांचा विजय झाला. तालुक्यातील या दोन पिता-पुत्रांच्या यश-अपयशाची चर्चा सुरू झाली आहे.

---

भाजपाच्या शिंदे-फडणवीस सरकारवर मोठा विश्वास दाखवत मतदारांनी अक्कलकोट व दुधनी बाजार समितीच्या निवडणुकीत मतदान केले. भाजपाला जनतेचा आशीर्वाद मिळाला. दुधनीत हुकूमशाहीला धक्का देत १५ वर्षानंतर सत्तांतर झाले.

**- सचिन कल्याणशेट्टी (भाजप आमदार)**

---

दोन्ही मार्केट कमिटीवर झेंडा आम्ही बिगर पैशाने झेंडा लावला. विरोधकांनी पैसे खर्च करूनही शेतकरी, व्यापारी आमच्यासोबत आले आहेत. त्यांचे काम आयुष्यभर करू.

**-सिद्रामप्पा पाटील(माजी आमदार)**

**अक्कलकोट मार्केट कमिटीतील विजयी उमेदवार**

**सहकारी संस्था सर्वसाधारण गट** - करपे बाबुराव (३५३), अप्पासाहेब पाटील (३५४), संजीव पाटील (३७८), सिद्रामप्पा पाटील (३७६), बाके कामगोंडा (३४८), बिराजदार धनराज (३४०), मल्लिकार्जून पाटील(३५७)
**महिला राखीव गट** - बिराजदार शिवमंगल धोंडप्पा(३७०), पार्वतीबाई स्वामी (३५३)
**इतर मागासवर्गीय गट** - प्रकाश कुंभार(३७७), बंदीछोडे राजेंद्र (३७७)
**अडत व्यापारी गट** - श्रीशैल घिवारे (८४), माशाळे बसवराज (८४)
**हमाल गट** - यल्लप्पा ग्वल्ल (५९)
**ग्रामपंचायत गट** - कार्तिक पाटील(४४५), शिवयोगी लाळसंगी(४१५), सिध्दार्थ गायकवाड (४६१), प्रकाश बिराजदार(४६६)

**दुधनी मार्केट कमिटीतील विजयी उमेदवार**

**सहकारी संस्था सर्वसाधारण गट** - बिराजदार देवेंद्र(२०५), सिध्दाराम बाके(२०४), विश्वनाथ नागुर(२०२), विश्वनाथ कोगनुर(२०१), मल्लिकार्जून झळकी (२०१), मोतीराम राठोड (२०१), परमशेट्टी सातलिंगप्पा(२००)
**महिला राखीव गट** - सुवर्णा मचाले (२०३), अश्विनी सालेगाव (२०३)
**इतर मागासवर्गीय गट** - शेख वहिदबाशा(२०१)
**भटक्या विमुक्त जाती गट** - पुजारी निंगण्णा(२०८)
**ग्रामपंचायत गट** - सिध्दाराम तोळणुरे(१७१), रमेश पाटील (१७०)
**आर्थिक दुर्बल घटक गट** - पाटील शिवानंद बाबुराव (१२१)
**अनुसुचित जमाती गट** - धसाडे इरण्णा (१२३),
**हमाल तोलार गट** - बाबु कोळी (१४५)
**बिनविरोध** - सातलिंगप्पा परमशेट्टी, चंद्रकांत येगदी

## सोहाळे येथे मोटार अडवून मारहाण करीत रोकड लुटली

### ६ जणांवर दरोड्याचा गुन्हा; दोघांना अटक

सुराज्य/सोलापूर

नाटक बघून रात्री घराकडे परतत असताना मोटार अडवून मारहाण करीत रोकड लुटल्याची घटना सोहळे (ता. मोहोळ) येथे शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली . या प्रकरणात कामतीच्या पोलिसांनी स्कॉर्पिओ मोटारीतून आलेल्या ६ जणाविरुद्ध दरोड्याचा गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली . त्यांना ४ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने रविवारी दिला आहे.

सागर उर्फ महांतेश श्रीशैल हुंडेकरी (वय २४ रा .भवानी पेठ,सोलापूर), राहुल उर्फ श्रीकांत सुरेश गेजगे (वय २८ रा.दमानी नगर,सोलापूर),श्रीनिवास गायकवाड, सुरज राठोड,अवि राठोड आणि विशाल राठोड (सर्व रा. दोड्डी ता.दक्षिण सोलापूर ) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. त्यापैकी सागर हुंडेकरी आणि राहुल गेजगे या दोघांना पोलिसांनी अटक करून पोलीस कोठडी घेतली आहे.



सोहळे (ता.मोहोळ) येथील प्रशांत विठ्ठल जगताप (वय ३८) हे शेतकरी शुक्रवारी रात्री सोहळे पासून एक किलोमीटर अंतरावर नाटक बघण्यासाठी गेले होते . रात्री ११ वाजेच्या सुमारास ते आपल्या मुलांसह बोलेरो जीप मधून घराकडे निघाले होते. त्यावेळी स्कार्पिओ मोटारीतून आलेल्या आरोपींनी त्यांची बोलेरो अडवून बेदम मारहाण केली . आणि त्यांच्या खिशातील ४ हजार ७०० रुपये रोख आणि इतर कागदपत्रे असलेली पाकिट लुटून घेतली. त्यावेळी गावातील नागरिकांनी एका आरोपीला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले होते. दरम्यान प्रशांत जगताप यांनी यासंदर्भात पोलिसात तक्रार दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी ६ जणाविरुद्ध दरोड्याचा गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली.पुढील तपास सहाय्यक निरीक्षक माने करीत आहेत.



## एमपीएससी परीक्षेत तीन हजार ६५३ उमेदवारांची दांडी

सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्र अराजपत्रित अधिकारी गट ब व क सेवा या पदासाठी संयुक्त पूर्व परीक्षा शहरातील ४९ केंद्रांवर झाली. सकाळी ११ ते १२ झालेल्या परिक्षेत १६ हजार ४४५उमेदवार परिक्षा देणार होते मात्र ३ हजार ६५३ उमेदवारांनी दांडी मारली १२ हजार ७९२ उमेदवरांनी परिक्षा दिली.

शहरातील ४९ केंद्रांवर ही परीक्षा झाली यासाठी १६ हजार ४४५ विद्यार्थी परीक्षेस बसणार होते. मात्र ३६५३ गैरहजार राहिले तर १२ हजार ७९२ उमेदवार हजर राहिले यासाठी ४९ अ वर्ग अधिकारी, ५७५ पर्यवेक्षक, ९४२ समवेक्षक, ९८ लिपिक, ९८ शिपाई यांची नियुक्ती केली होती. परिक्षा केंद्रावर पोलिस बंदोबस्त तसेच प्रत्येक केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले होते. डिमी उमेदवार परीक्षेला बसू नये यासाठी डोळे तपासणी करणारी यंत्रणाही तैनात केली होती. . तसेच परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर, ध्वनीक्षेपक, संगणक केंद्र, इंटरनेट कॅफे इत्यादी दळणवळणाची माध्यमे बंदी घालण्यात आली होती. सर्वत्र परिक्षा शांतेत पार पडली असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी दिली.

## खोदकाम करताना डोक्यात दगड पडल्याने मजूर ठार

सोलापूर : विहिरीचे खोदकाम करीत असताना ५० फुट उंचीवरून दगड डोक्यात पडल्याने ४१ वर्षीय मजूर गंभीर जखमी होऊन मरण पावला.

ही दुर्धघटना जेऊर (ता. अक्कलकोट) येथे शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. सुभाष सोमलिंग राठोड (वय ४१ रा. गोपाळतांडा, जेऊर ता.अक्कलकोट) असे मयताचे नाव आहे . कालं सकाळी १० वाजेच्या सुमारास ते जेऊर शिवारातील गौराबाई सुतार यांच्या शेतातील विहिरीचे खोदकाम करीत होते. त्यावेळी उंचावरून मोठा दगड त्यांच्या डोक्यावर पडल्याने ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना सोलापूरच्या गंगामाई हॉस्पिटल येथे दाखलकेले असता ते रविवारी सकाळी मयत झाले.

मयत सुभाष राठोड यांच्या पश्चात आई-वडील,पत्नी,दोन मुले आणि एक मुलगी असा परिवार आहे. शासकिय रुग्णालयात शैवविच्छेदन झाल्यानंतर त्यांचा मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आला. या घटनेचे प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

**सुराज्य** सोलापूर

**उद्याचा अंक नाही**

महाराष्ट्र आणि कामगार दिनानिमित्त सुराज्य कार्यालयास १ मे २०२३ रोजी सुट्टी असल्याने उद्या दि. २ मे २०२३ चा अंक प्रकाशित होणार नाही, याची नोंद वाचक, विक्रेते, जाहिरातदार यांनी घ्यावी, ही विनंती.

**- संपादक**

## नग्न फोटो सोशल मीडियावर अपलोड करण्याची धमकी

सुराज्य/सोलापूर

ओळखीचा गैरफायदा घेत शरीर संबंधाचे नग्न फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊन वारंवार शरीरसंबंध ठेवल्याप्रकरणी एका युवकाच्या विरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेची हकिकत अशी की,पीडित तरुणीच्या घराशेजारी राहणाऱ्या एका महिलेकडे पुतण्या होऊन आलेल्या तरुणाने त्या पिडीत तरुणीचा मोबाईल नंबर घेऊन तिच्याबरोबर लगट वाढवली. त्यानंतर वारंवार फोन करणे, धमकी देणे असे प्रकार केल्याने त्याच्या विरोधात २०२१ साली पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल झाला होता. असे असताना सुध्दा त्या गुन्ह्यातून बाहेर आल्यानंतर त्याने परत त्या पीडित तरुणीशी संपर्क वाढवत तिला विश्वासात घेऊन पुन्हा तिच्याबरोबर २०२२ पासून मंगळवेढा रोडवरील एका जंगलात नेऊन तीन ते चार वेळा शरीरसंबंध ठेवले. त्यावेळचे नग्न फोटो काढले. तसेच पुढे पीडित तरुणीच्या भावाच्या आयडीवर रिक्वेस्ट पाठवून पीडित तरुणीच्या फोटो खाली अश्लील मजकूर पाठवून दिला. अशा पध्दतीने त्या तरुणाने चार प्रकारचे इन्स्टाग्राम अकाउंट काढून पीडित तरुणीची बदनामी केली. त्यामुळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात संशयित आरोपी नितेश भरत सावंत (रा. अरळी, ता.मंगळवेढा) याच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.


## कोर्ट वॉरंटच्या भीतीने विवाहीत तरुणाची गळफासाने आत्महत्या

सोलापूर : न्यायालयातील वॉरंटच्या भितीने एका विवाहीत तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना जुना विडी घरकुल येथे शनिवारी रात्रीच्या सुमारास उघडकीस आली .

गौस हबीबरहमान शेख(वय ३५ रा.जुना विडी घरकुल) सोलापूर) असे गळफास घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. तो मजुरीचे काम करायचा. त्याची पत्नी सध्या माहेरी असून कौटुंबिक न्यायालयात त्यांचा वाद चालू आहे. या खटल्या संदर्भात वॉरंट निघण्याच्या भीतीने त्याने शनिवारी रात्री राहत्या घरात खुर्चीवर उभारून दरवाजाला साडीच्या सहाय्याने गळफास घेतला होता.

**तिसरा डोळा**

– प्रकाश पोरे



**रद्दी नाही... तुम्ही दिलेली आश्वासने आहेत!**


## राज्यात पुढील पाच दिवस अवकाळी पावसाची शक्यता

सुराज्य/सोलापूर

**महाराष्ट्रासह देशभरात पुढील ५ दिवस अवकाळी पावसाची शक्यता आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागाने हा अंदाज व्यक्त केला असून, शुक्रवार ५ मे पर्यंत देशभरात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. उत्तर भारतात सर्वाधिक पाऊस पडेल, असा अंदाज आहे.**

महाराष्ट्रासह देशभरात पुढील ५ दिवस अवकाळी पावसाची शक्यता आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागाने हा अंदाज व्यक्त केला असून, शुक्रवार ५ मे पर्यंत देशभरात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. उत्तर भारतात सर्वाधिक पाऊस पडेल, असा अंदाज आहे. एकीकडे पाऊस तर दुसरीकडे गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रातील अनेक भागात तापमानात वाढ झाली होती. अनेक भागात पारा चाळीशीच्या पुढे गेला होता.

राज्यात अनेक ठिकाणी अवकाळी पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले. अमरावती जिल्ह्यात अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे आंबा आणि संत्री कुजली आहेत. कांद्याचे पीक उद्ध्वस्त झाले आहे. बीड जिल्ह्यातील वडवणी आणि गेवराई तालुक्यात अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. नांदेड जिल्ह्यातील नायगाव, कंधार येथे आज सकाळी जोरदार पाऊस झाला. बुलढाण्यातील मोताळा येथेही जोरदार पाऊस झाला. आता पुढील पाच दिवसही महाराष्ट्रातील अनेक भागात अवकाळी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.



पुढील पाच दिवस उत्तर भारतात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे, तर मध्य प्रदेश, महाराष्ट्रातील विदर्भ आणि छत्तीसगडमध्ये हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. पावसासोबतच जोरदार वारेही वाहतील. महाराष्ट्राच्या अनेक भागात गारपीट होण्याची शक्यता आहे. दक्षिण भारताबद्दल बोलायचे झाले तर, आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटकचा काही भाग, तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल आणि केरळमध्ये पुढील पाच दिवसांत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान खात्यानुसार, महाराष्ट्रासह देशातील काही राज्यांमध्ये पावसासोबत विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी विजाही पडू शकतात. या अवकाळी पावसामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

# कोकणची दशा...

कोकणवासियांना आंदोलने आणि पोलिसांच्या बळाचा वापर हे काही नवीन नाही. एखादा प्रकल्प आला की, कोकणवासियांची आंदोलने सुरू व्हायला लागतात. त्या आंदोलनाला राजकीय पाठबळ असते. कोकणात शिवसेनेचे वर्चस्व. आम्ही ठरवू तेच कोकणात होणार, अशा शिवसेनेच्या ठाकरे गटाचा शिरस्ता. एन्रॉनला शिवसेनाप्रमुखांनी विरोध केला. आता रिफायनरीला विरोध होतो आहे. ठाकरे यांच्याकडून जो आदेश येईल, त्यानुसार कोकणातील आंदोलनाचे स्वरूप ठरत असते. प्रकल्प येण्याआधीच त्याची गंधवार्ता लागलेले पुढारी आणि गब्बर मंडळी जमिनीचे व्यवहार उरकून मोठा वाटा मिळविताना दिसतात. 'गाव शंभर टक्के प्रकल्पाच्या विरोधात तर शहरातील मालकांनी जमिनी विकून पोबारा केला अशी विचित्र स्थिती सर्वत्रच आहे.' जमिनीची मालकी नाही म्हणजे प्रकल्पग्रस्त म्हणून नोंद नाही. प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या दिल्या गेल्या तर त्यावर दावाही सांगता येत नाही, अशी अडचण आहे. मासेमारीवर उपजीविका असणाऱ्या मच्छीमारांची तर घरेही समुद्रकिनारीच आहेत. खाडीकिनारीच असलेल्या जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पातून तसेच कोळशाच्या वीज प्रकल्पातून गरम पाणी समुद्रात सोडले जाऊन मच्छीमारांची उपजीविकाच धोक्यात येणार इतकेच नाही, त्यांना घरदारही सोडावे लागणार. त्यामुळे प्रकल्पविरोधात हीच मंडळी सर्वत्र आघाडीवर आहेत. जमीन मालकी, जमीन कसण्याशी त्यांचा केव्हाच संबंध आला नाही, अन्य कसलेही कसब-कौशल्यही गाठीशी नाही. 'कसेल त्याची जमिनीचा कायदा करणाऱ्या शासनाने मग समुद्र-खाडी-नद्या आमच्या नावावर का केल्या नाहीत?' असा त्यांचा सवाल आहे. देवराया, देवस्थानांच्या जमिनी, इनाम, वतन जमिनींचे प्रमाण पाहता गुंतागुंत मोठीच आहे. अगदी मधु दंडवते, नाथ-पै यांच्यापासून



ते आजच्या राणे-राऊतांपर्यंत कोकणचे राजकीय प्रतिनिधित्व हे खरे तर दुर्दैवाने वरून लादलेले अशाच धाटणीचे राहिले आहे. मुंबईतून नेमल्या गेलेला कथित संपर्कप्रमुखच मग इथला पुढारी आणि निवडून येणारा लोकप्रतिनिधी बनतो, अशी जणू रीतच बनली आहे. ध्यास कोकण विकासाचा, पण त्यासाठी होणाऱ्या सभा, परिषदा मात्र मुंबई-ठाण्यातच उरकल्या जातात. त्यामुळे येथील विकासाचा खाक्या हा आयात केलेल्या प्रारूपावर बेतलेला आणि लोकविन्मुख आहे. कोकणात आजवर जे थोडेथोडके प्रकल्प साकारले गेले त्यातून नेमके कुणाचे भले झाले, हे लोकांना सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ दिसत आहे. प्रकल्प येत असल्याची आवई उठण्याआधीच जमिनींचे मोठमोठे बेनामी व्यवहार कोणकोणत्या पुढाऱ्यांकरवी केले गेले. कुणी हॉटेल्स बांधली, आलिशान बंगले उठवले, पेट्रोप पंप थाटले, डंपर्स घेतले, क्वारीज काढल्या हे लपून राहत नाही. निवडणुकांच्या तोंडावर अरबी समुद्रात बुडवण्याचे वचन दिलेला प्रकल्प, सत्तेवर येताच घाईघाईने मार्गी लागताना दिसतो. 'लोकांना नको असेल तर असे प्रकल्प येणारच नाहीत,' ही भूमिका तकलादू आणि फोल आहे हे बारसूतील लोक अनुभवतच आहेत. कोकणच्या विकासाच्या प्रश्नाचा अनेक सरकारी समित्यांच्या अहवालात विचार करण्यात आला आहे. मुळात विकासाच्या प्रश्नाची उठाठेव हा मूठभर लोकांचा मक्ता नसून, त्याचे सार्वत्रिकीकरण व्हावे, असे ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ आणि पश्चिम घाट संरक्षणाबाबतच्या पहिल्या समितीचे अध्यक्ष डॉ. माधव गाडगीळ यांनी त्यांच्या अहवालात म्हटले आहे. 'राजकीय नेते आणि बाबूंनी, विकास म्हणजे काय हे दिल्ली, मुंबईत बसून ठरवू नये. या निर्णयप्रक्रियेत लोकांचा सहभाग असायलाच हवा. निसर्गरक्षणासाठी आणि लोकशाहीसाठी ते योग्यच आहे. ग्रामसभांना विश्वासात घेऊन विकास कसा करायचा ते ठरवा', असे त्यांचा अहवाल सांगतो. आधीच्या सरकारी समित्यांप्रमाणे, गाडगीळ समितीचा हा अहवालही दडपला गेला. पर्यायी आणि चिरंतन विकासासाठीच्या अन्य अभ्यास समित्यांच्या शिफारशींनाही हरताळ फासण्याचे काम आजवरच्या शासनकर्त्यांनी केले आहे. अशा समित्या नावालाच असतात. कारण राज्यकर्त्यांना स्वतःची हुकूमशाही चालवायची असते. बाहेरून प्रकल्प आले तरच रोजगार वाढणार आहे, अन्यथा नाही.प्रकल्प उभारणीत राजकारण होऊ लागले तर मोठ्या उद्योगपतींची त्या शहरांमध्ये येण्याची तयारी नसते. कारण मोठी गुंतवणूक करून प्रकल्प अर्धवट ठेवणे त्यांच्या हिताचे नसते. कोकणात उद्योग फारसे नाहीत. एकतर फळबागा व पर्यटन हेच त्या भागाचे अर्थकारण. सागर किनारी जागा पडून आहे. तिथे प्रकल्प उभारले तर रोजगार वाढू शकतो. एकीकडे रोजगाराची भाषा करायची आणि येणाऱ्या प्रकल्पांना विरोध करायचा हा विरोधाभास किती दिवस चालणार. कोकणची दशा कोण पाहाणार?

महाराष्ट्र दिन

# गर्जा महाराष्ट्र माझा...!

**आजच्या दिवशी १९६० साली महाराष्ट्र या मराठी भाषिक राज्याची निर्मिती झाली. आज त्या घटनेला ६३ वर्षे झाली. हे राज्य होण्यासाठी कित्येकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. मुंबई मध्ये १०५ हुतात्मे बळी पडले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत आचार्य अत्रे, एस. एम. जोशी, कॉम्रेड डांगे इत्यादी नेत्यांनी सारा महाराष्ट्र ढवळून काढला. 'मराठा' या वृत्तपत्रातून आचार्य अत्रेंनी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ जोरात उभी केली. अखेर मराठी भाषिक राज्याचा मंगल कलश १ मे १९६० रोजी महाराष्ट्राला मिळाला.**

आजही बेळगाव व कर्नाटकातील सुमारे ८६५ मराठी भाषिक गावे यांचे महाराष्ट्रात विलिनीकरण झाले नाही. सध्या हा प्रश्न सुप्रीम कोर्टापुढे आहे. महाराष्ट्र राज्य झाल्यानंतर त्याची धुरा मुख्यमंत्री या नात्याने यशवंतराव चव्हाण यांनी घेतली. सध्या एकनाथ शिंदे हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपमुख्यमंत्री आहेत महाराष्ट्र हे राज्य भारतात लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. मात्र क्षेत्रफळाच्या बाबतीत ते तिसऱ्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या ११ कोटींवर असून एकट्या मुंबईमध्ये एक कोटी ८० लाख लोक राहतात. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असून नागपूर ही उपराजधानी आहे.

मुंबईमध्ये देशातील विविध बँका तसेच विविध कार्यालये असून ते देशातील एक महत्त्वाचे आर्थिक केंद्र आहे. महाराष्ट्राचा विस्तार १,१८,८०९ चौरस मैल असून दक्षिण दिशेला कर्नाटक, उत्तरेकडे गुजरात व मध्यप्रदेश तसेच पूर्वेकडे आंध्रप्रदेश ही राज्ये येतात. पश्चिम दिशेला अरबी सागर आहे. पश्चिम किनारपट्टीचा सागरी किनारा ७२० किलोमीटर आहे. महाराष्ट्राचे एकूण कारभाराच्या सोयीसाठी पाच विभाग केलेले आहेत. त्यामध्ये पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर हे ते पाच विभाग आहेत. जिल्ह्याची संख्या ३६ एवढी आहे. महाराष्ट्राची मातृभाषा मराठी असून ती बोलणाऱ्यांची संख्या ६ कोटी २४ लाखांहून अधिक आहे. साक्षरतेचे प्रमाण ८२.९ टक्के एवढे आहे. स्त्री पुरुष जन्मदर पुरुष १०० तर स्त्रियां ९४६ असा आहे. महाराष्ट्र हे देशातील एक विकसनशील राज्य असून त्याला सांस्कृतिक परंपरा आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, एकनाथ, गाडगेबाबा इत्यादी संत महाराष्ट्रात होऊन गेले आहेत अगदी प्राचीन काळापासून महाराष्ट्राची भूमी विख्यात आहे. ऋग्वेदामध्ये सुद्धा 'राष्ट्र' म्हणून उल्लेख आहे. महाराष्ट्रातील विविध स्थानाचा उल्लेख रामायण व महाभारतात आहेत. महाराष्ट्राच्या उत्तरेस सातपुडा पर्वत तर पश्चिमेस सह्याद्रीच्या रांगा आहेत. देशाच्या औद्योगिक उत्पादनात महाराष्ट्राचे प्रमाण १३ टक्के आहे. महाराष्ट्रातील सुमारे ६४.१४ टक्के एवढी लोकसंख्या कृषी व संबंधित उद्योगात आहे. देशात सर्वात जास्त धरणे महाराष्ट्रात असून मोठी धरणे १८२१ एवढी आहेत. किल्ले व गड या बाबतीत महाराष्ट्र अतिशय समृध्द आहे. सुमारे ३५० पेक्षा जास्त किल्ले महाराष्ट्रात आहेत. देशात ही संख्या महाराष्ट्रात सर्वात जास्त आहे. अजिंठा वेरूळ येथील जगप्रसिद्ध वारसा लाभलेली लेणी, मुंबईचे जगप्रसिद्ध सीएसटी स्टेशन, पश्चिम महाराष्ट्रातील फुलांनी बहरलेले कास पठार, उल्केतून तयार झालेले लोणार सरोवर ही जागतिक वारसा स्थळे महाराष्ट्राचे भूषण आहे महाराष्ट्र हे देशातील शिक्षण व्यवस्थेत एका प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते. कोळसा निर्मित व अणुऊर्जा निमित्त ऊर्जा क्षेत्रात महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. आज महाराष्ट्रात २० विद्यापीठे असून एक सेंट्रल विद्यापीठ आहे तसेच २१ विद्यापीठे आहेत. महाराष्ट्र विधानसभेतील आमदारांची संख्या २८८ एवढी आहे. खासदारांची संख्या ६७ आहे त्यामध्ये लोकसभेचे ४८ व राज्यसभेचे १९ अशी संख्या आहे. महाराष्ट्राचे लोकगीत म्हणून **जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा....!** ह्या राजा बढे यांनी लिहिलेल्या व श्रीनिवास खळे यांनी संगीत बद्ध केलेल्या व शाहीर साबळे यांनी गायलेल्या ह्या गीताला महाराष्ट्र सरकारने 'महाराष्ट्र गीत' म्हणून मान्यता दिली आहे.




आजही महाराष्ट्रासमोर अनेक आव्हाने उभी आहेत. त्यामध्ये प्रादेशिक असमतोल, बेरोजगारी, दरवर्षी असणारा दुष्काळ, यावर पाणी आडवा पाणी जिरवा ही मोहीम तसेच शेततळी ही मोहीम सरकारतर्फे काम करत आहे. पावसाळ्यातील पडणारा थेंब अन् थेंब अडवून शेतीला पाणी पुरवठा केल्यास महाराष्ट्रातील दुष्काळाचे चित्र पालटेल. वास्तविक देशात सगळ्यात जलसंधारण केंद्रे महाराष्ट्रात आहेत तथापि आजही अनेक भागात पाण्याची त्यांची भासते. अजूनही मराठी भाषा ही अभिजात भाषेच्या सर्व अटी पूर्ण करूनही अद्याप पर्यटन मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला नाही. कोरोनाचे संकट साऱ्या देशावर व महाराष्ट्रावर मोठे होते. आत्ता कोठे परिस्थिती पूर्वपदावर येऊ लागली आहे.

महाराष्ट्राच्या सर्वच क्षेत्रात प्रगती होवो व देशात महाराष्ट्र हे प्रथम क्रमांकाचे प्रगतिशील राज्य गणले जावो तसेच कोरोना नष्ट होवो. महाराष्ट्राबरोबर देशही प्रगतिपथावर जावो, हीच महाराष्ट्र दिनी लाखो जणांची अपेक्षा.

**- शांताराम वाघ, पुणे.**

टुडेज् ब्लॉग


# स्वच्छ पाणी

भारतामध्ये कुठल्याही ठिकाणी स्वच्छ पाणी कुठेही पहायला मिळत नाही. प्रत्येक नदी, तळी, प्रदूषणाने भरलेली आहेत. आपल्याकडे स्वातंत्र्यानंतर कारखानदारी वाढली पण कंपन्यांवर कुणाचेच नियंत्रण नव्हते व नाही. पेप्सी, कोकाकोला वगैरे कंपन्या जवळपासच्या खेड्यांवरचे पाणी, हवा प्रदूषित करत सुखनैव चालल्या आहेत. त्यावर आपण नियंत्रण ठेवू शकत नाही. जागतिकीकरणापासून या प्रदूषणाला फारच वेग आला आहे. केंद्र सरकार काय किंवा राज्य सरकार काय, कुठल्याही पक्षाचे असले तरी याबाबतीत काहीच करु शकत नाही. इतक्या ह्या कंपन्या बलाढ्य बनल्या आहेत. महाराष्ट्रात तर स्वत:चे स्थान बळकट करण्यातच सध्या सरकारचे बळ वापरले जाते आहे. त्यांना लोकांच्या प्रश्नांशी काहीही देणेघेणे नाही. सध्या पावसामुळे राज्यात सर्व पिके गेली तरी त्यांचे एकमेकांना लाथा देणेच चालू आहे.

मला वाटते, याला आपणच जबाबदार आहोत. डाव्या पक्षांचा आपण फक्त वेतन वाढवून घ्यायला उपयोग करुन घेतला. नंतर मतं उजव्या पक्षांना दिली. ते फक्त उद्योगपतींचे हित बघणार हे आपल्याला दिसत असताना त्यांनाच मतं देऊन बसलो. अदानी प्रकरण आपल्यासमोर घडले. काहीतरी त्यात सत्य असल्याशिवाय एवढा धूर निघेल का? या उद्योगपतींनी कितीतरी स्वच्छ नद्या आरामात प्रदूषित केल्या आहेत. काही विरोध केला गेला तर हे आपले उद्योगधंदेच बंद करतील. एवढा त्यांचा प्रभाव सरकारवर आहे.

सामान्य जनतेसाठी २०१४ पासून एक तरी खरेखुरे काम केंद्र सरकार व राज्य सरकारने केले आहे, असे मला दाखवून द्यावे. नुसते काँग्रेसवर सगळ्या अपयशाचे खापर फोडण्याशिवाय मोदी सरकारने काय केले? कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत लोक गंगेत प्रेते टाकून देत होते. याला सरकार जबाबदार नव्हते का? सगळं प्रकरण यशस्वीपणे दडपून टाकण्यात केंद्र व राज्य सरकारे यशस्वी झाली. कारण जनता वेडी व मूर्ख होती. त्यांनी कशालाच विरोध केला नाही.

फक्त रामलल्ला सगळं करेल, या भोळेपणावर उत्तर प्रदेश डोलत आहे. लोक एवढे निष्क्रिय कसे झालेत? देशात प्रचंड बेकारी आहे. माफिया राज छान चालू आहे. काहीतरी छोटी छोटी पिल्ले सरकार सोडत आहे. कुठे सरकार भरती करत आहे तरुणांची? प्रत्यक्ष कुठेच काही दिसत नाही. नुसत्या घोषणा सगळीच सरकारे करत आहेत. तरुण कुठे मिरवणुकीत, मोर्चात, सभेला तर पैसे घेऊन गर्दी करताना दिसत आहेत. तेवढेच पैसे गाठीला, हा हिशेब सगळीकडे दिसत आहे. आता २०२४ ची लोकसभा




निवडणूक येत आहे. आता तरी लोकांनी विचार करुन मतदान करावे अशी अपेक्षा आहे. ५००, १००० रुपये घेऊन मतदान केले तर हीच सरकारे आपल्या डोक्यावर अक्षरश: मिरे वाटतील.

भारतातील लोक तसे सुज्ञ आहेत. त्यांना सगळे काही दिसते. पण प्रश्न त्यांच्यापुढे असे आहेत की कोण अगदी स्वच्छ आहे हे पाहण्याचा? तसा माणूस निवडणुकीला उमेदवार म्हणून कसा उभा राहू शकेल? प्रचंड पैसा निवडणुकीत वाहत असतो. दारुच्या रुपाने हे कसे गरीब उमेदवाराला जमावे. लोकही त्याचे डिपॉझिट जप्त होईल, हेच बघणार. असं एकंदर चित्र आहे. लोकांनी त्यातल्या त्यात चांगल्या पक्षाला मते द्यावीत, एवढेच आपण करु शकतो. कुठल्याही पक्षाच्या भूलापांना फसू नये, आपण त्यांचे काम प्रत्यक्षपणे डोळसपणे पहायला पाहिजे. एकतरी नदी, तळी २०१४पासून खरोखर स्वच्छ झालेली दिसत आहेत का? उद्योगपतींची आरती करताना केंद्र व राज्य सरकारे दिसत आहेत. सायलंट व्हॅलीसारखे आंदोलकही आता कुठे दिसत नाहीत.

**- संजीवनी देशपांडे, सोलापूर.**

जन्म हा अखेरचा

# कायानुग्रहस्थल - ३



आणि शास्त्रविहित कर्मामुळे ते एक सुखरत्न होय. 'उपकार' हे एक पाचवे सुखरत्न होय. नुसती पाने उलटत बसले तरी आयुष्यभर संपणार नाहीत एवढे ग्रंथलेखन महर्षी व्यासांनी केले आहे. आपल्या सर्व ग्रंथांचे सार त्यांनी अर्ध्या श्लोकात सांगितले आहे.

**अष्टदश पुराणाणां सारो**
**व्यासेन कीर्तित:।**
**परोपकार: पुण्याय पापाय**
**परपीडनम् ।।**

विस्तारपूर्वक लिहिणारे व्यासमहर्षी संक्षेप करण्यात देखील कुशल होते. वेदपुराणांचे सार त्यांनी एका श्लोकार्धात सांगितलेले आहे. परोपकार करणे हे पुण्य आणि दुसऱ्याला दु:ख देणे हे पाप. पुण्य-पापावरच सर्व प्रपंच उभा असतो. पुण्य-पापामुळेच आपल्याला शरीर मिळालेले असते. त्याचप्रमाणे प्रवचन ऐकले नाही तरी चालेल, ध्यान केले नाही तरी चालेल, परंतु दुसऱ्याला दु:ख देऊ नये. एवढे केले तरी चालेल. पूजा करा, ध्यान करा, उपवास करा, दुसऱ्याला दु:ख दिले की सारे व्यर्थ जाते. म्हणून दुसऱ्यावर उपकार करणे हे सुखरत्न आहे. तुम्हांला दु:ख हवे असेल तर दुसऱ्याला दु:ख द्या. सुख हवे असेल तर दुसऱ्याला सुख द्या. आपल्याला पुण्य चांगले वाटते पण ते करायला नको असते. हेच तर मोठे अवघड आहे. म्हणून तुलसीदासांनी उपकार करा, असे सांगितले. संतांचा सहवास, हरिभजन, प्राणिमात्रांवर दया, धर्माचे आचरण आणि परोपकार ही असार संसारातील पाच रत्ने होत. या पंचरत्नांचा संग्रह संत करतात म्हणून ते सुखी असतात. आपण मात्र ही पंचरत्ने सोडून बाकी साऱ्या पदार्थांचा संग्रह करतो. म्हणून दु:खी असतो. त्यामुळे संसारी जीव दु:खी असतो तर योगी सुखी असतो. शिवयोगी सुखसागर अशा परशिवात आपले चित्त विलीन करतो म्हणून त्याची भावना शिवमय होऊन जाते. शिवमय भावनेमुळे त्याला अविद्यानिर्मितं प्रपंच न दिसता शिवच दिसतो. सर्व प्रपंच शिवमय कसा दिसतो याविषयी पुढे सांगतात,

**नेदं रजतमित्युक्त यथा**
**शुक्ति: प्रकाशते ।**
**नेदं जगदिति ज्ञाते शिवतत्त्वं**
**प्रकाशते ।। १७-१०।।**

या श्लोकात एक दृष्टांत देऊन ज. रेणुकाचार्यांनी विचार स्पष्ट केला आहे. रस्त्याच्या कडेला पडलेली शिंप उन्हात चांदीसारखी चमकते. चांदी हस्तगत करण्यासाठी जर कोणी जवळ गेला तर त्याला तिचे खरे स्वरुप समजते. शिंप ही शिंपच असते, ती चांदी कधीच होत नसते.

**(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

# ...यांना कठोर शासन व्हावे !

हिंदू मुलासोबत फिरते म्हणून एका मुलीचा भर रस्त्यात छळ करण्यात आल्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर आणि वृत्त वाहिन्यांवर फिरतो आहे.

या व्हिडिओत एका हिजाब घातलेल्या मुलीशी काही तरुण भर रस्त्यात छेडछाड करत असल्याचे दिसत आहे. या व्हिडिओत त्या तरुणांनी तिचा मोबाईल हिसकावल्याचेही दिसत आहे. हे सर्व सुरू असताना रस्त्यावरून जाणारे अन्य लोक मात्र त्याकडे दुर्लक्ष करून पुढे जात असल्याचे दिसत आहे.

मानवतेला काळिमा फासणारा हा प्रकार पाकिस्तानातील नसून महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगरमधील आहे आणि तिच्याशी छेडछाड करणारेही तिचे नातेवाईक आहेत. केवळ हिंदू मुलासोबत फिरताना दिसली म्हणून नातेवाईकांकडून भर रस्त्यात तिला अशी वागणूक मिळत असेल, तर घरात तिची काय अवस्था केली गेली असेल? धर्मनिरपेक्ष भारतात परधर्मीय मुलासोबत फिरणे हा एव्हढा मोठा गुन्हा आहे का? एरव्ही राष्ट्रीय एकात्मतेच्या गोष्टी करणारे तथाकथित विचारवंत या प्रकरणी काही बोलणार आहेत का? एका स्त्रीची भर रस्त्यात मानहानी केली जाते आणि आजूबाजूचा समाज त्याकडे दुर्लक्ष करून पुढे जातो हे समाजाच्या भावना मेल्याचेच लक्षण



असून अशा समाजावर पुढे प्रतिकूल प्रसंग ओढवल्यास त्यांना कोण साहाय्य करणार? हिंदूंच्या प्रथा परंपरांना नावे ठेवून स्त्री हक्काच्या नावाने गळा काढणारा महिला आयोग या घटनेवर काही कृती करणार आहे का? अशा घटना केवळ मानवतेलाच नव्हे, तर भारताच्या एकसंधतेलाही आव्हान देणाऱ्या असल्याने यातील गुन्हेगारांना कठोर शासन होणे गरजेचे आहे.

**- जगन घाणेकर, मुंबई.**



# - संतविचार -

डॉ. देविदास गुरव, सोलापूर

# 'ती जाण निश्चिती तामस'

**'ज्यासी स्वधर्मी नाही रती ।**
**आवडे अधर्म प्रवृत्ती ।।**
**क्रोध लोभ गिळली स्फूर्ती ।**
**ती जाण निश्चिती तामस'**

तमोगुणांच्या प्रभावाखाली मनुष्य आला की, इंद्रियाकडून पापकृत्यांना ऊत येतो. अधर्म वाढतो. दुष्ट कर्म आवडू लागतात. तामसी कर्म आवडू लागतात.अशा वृत्तीमुळे व्यक्तीचे अंतरंग कुकर्माचे आगर बनते. ती व्यक्ती कशी वर्तन करते, ती व्यक्ती ओळखावी कशी, त्याची वृत्ती-प्रवृत्ती किती आधम असते. याचे अचूक विवेचन नाथ माऊली करतात. धनलोलुपता, परद्रव्य अपहार, अवहेलना, द्वेष, तिरस्कार व भ्रष्ट आचरण हे तमोगुण वृध्दीमुळे घडून येतात. आज तामस गुणयुक्त प्रवृत्तीची माणसे जागोजागी पाहावयास मिळत आहेत. निंद्य कर्म करण्यात धन्यता मानणारी पावलापावलावर भेटत आहेत. संत ज्ञानेश्वरांनी अशा वृत्तीला बिसाट अग्नीची उपमा दिली आहे. ते खरेच वाटते. कार्याकार्य विवेक लुप्त होऊन व्यभिचारचा उद्रेक होतो आहे. विपरित परिस्थितीचा फायदा लाटणारे समाजात काही कमी नाहीत. समाजात तामसी भावना वाढली की नैतिक मूल्यांचे किती अध:पतन होते यावर परखडपणे संतांनी भाष्य केले आहे. मानवातील व समाजातील उणीवांवर बोट ठेवले आहे.

**देह जन्मला व्यर्थ । झाले पापाचे पर्वत ।।**
**दान धर्म नाही केला ।**
**शेवटी जन्म व्यर्थ गेला ।।**
**देह अवघा क्षणभंगुर ।**
**दिसे स्वप्नवत सार ।।**
**नरहर म्हणे शेवटी । दास हो साधुसंतांचा' ।।**

संत नरहरी सोनार म्हणतात, 'हे मानवा! जन्म व्यर्थ घालवू नकोस. देहासक्त न राहता परमार्थ साधना कर, म्हणजेच ऐहिक सुखाचा अति हव्यास न धरता पुण्यकर्म कर. मोहमायेत न गुरफटता जमेल तसे परोपकार कर. देह हा क्षणभंगूर आहे. त्याच्या आधीन होऊ नकोस. देहाहंकार मनी न ठेवता तुझे आचरण शुद्ध ठेव.

जीवनमार्गावरून वाटचाल करताना संत सज्जनांचा सहवास हवा. त्यांचे 'भक्तीतत्व' निश्चितच आज सर्वांसाठी अनुकरणीय आहे. ईश्वरी भक्ती ही संजीवनी आहे. संत नरहरी त्याचा संबंध आपल्या जोडतात. सुवर्णाच्या व्यवसायातही ते सात्विकता व परमार्थ जपता येते हे आचरणातून दाखवून दिले. अर्थात सात्विकता जपणारे, सदाचरणी व परोपकारी व्यक्तीही समाजात आहेत. पण त्यांचे प्रमाण फारच अल्प आहे हे वास्तव नाकारूनही चालत नाही. क्षणिक मोहाला बळी पडून तामस कर्मात रत झाल्याने त्याचे भयंकर दुष्परिणामही त्यांना भोगावे लागते. म्हणून संतांनी 'निषिद्ध कर्म त्याज्य करावे, सत्कर्मी व्हावे' केवळ असा बोधोपदेश न करता स्वत:च्या शुद्ध आचरणातून जाणीव करून दिले आहे.

नाथांचे संबंध जीवनच सात्विकतेचे उच्चतम प्रतिकच होते. सात्विक वृत्तीने तामसीत्वाचा नाश



करता येतो हे नित्य आचरणातून दर्शवले आहे. तमोगुण विंचवासारखे दाहक असते. ती क्षणोक्षणी वाढत जाते. 'तमोगुण मागे सारा, सत्वगुण लावा अंगारा' असे नाथांनी भारूडातून तमोगुणावर उपायही सांगितला आहे.

'वाढलिया सत्वगुण, चित्ता सदा सुप्रसन्न' सत्ववृध्दी झाली की, चित्तामध्ये व चिंतनात विधायक परिवर्तन घडून येते. हे मानवा! देहाभिमान बाळगून व विषय सुखाच्या लालुचिला भुलून तू नीच कर्म करू नकोस.

'मी' पणा न मिरवता अहंकार व आसक्तीचा परित्याग कर. सत्संग व सद्विचारांची मनी आस धर. 'निर्विकल्पे स्वधर्माचरण'कर सात्विक 'आहार-विहार', सात्विक विचार सात्विक वाणीचे अनुसरण कर हेच संतविचारांचे व संतवाणीचे सार आहे.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# सांगोला बाजार समितीवर शेतकरी विकास आघाडीचे निर्विवाद वर्चस्व

## ॲड.सचिन देशमुख यांच्या स्व. गणपतराव देशमुख परिवर्तन आघाडीचा दारुण पराभव

**सुराज्य/सांगोला**

सांगोला तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीत शेकाप, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना शिंदे गट, भाजपा, काँग्रेस या पक्षाच्या सांगोला तालुका शेतकरी विकास आघाडीचे दोन उमेदवार यापूर्वीच बिनविरोध निवडून आले होते. उर्वरित १६ ही उमेदवार प्रचंड मताधिक्याने विजयी झाले तर ॲड.सचिन देशमुख यांच्या स्वर्गीय गणपतराव देशमुख परिवर्तन आघाडीचा दारुण पराभव झाला आहे.

मतमोजणी सायंकाळी ६ वाजता सुरू झाली. प्रथम व्यापारी मतदारसंघाची मतमोजणी झाली. त्यामध्ये शेतकरी विकास आघाडीचे अमजद शब्बीर बागवान २०६ मते तर रामचंद्र नारायण बाबर यांना १५८ मते मिळवून विजयी झाले तर याच गटातील सूरज बनसोडे यांना सत्तर मते मिळाली असून त्यांचा पराभव झाला आहे. हा पराभव अनेकांना जिव्हारी लागला आहे. त्यानंतर ग्रामपंचायत मतदारसंघाची मतमोजणी झाली. या मतदारसंघातील एक उमेदवार चंद्रकांत करांडे हे यापूर्वीच बिनविरोध विजय झाले होते. तीन जागेसाठी मतदान झाले. त्यामध्ये सर्वसाधारण गटातील शेतकरी विकास आघाडीचे किशोर भानुदास शिंदे ४९२ मते व समाधान शेषनारायण पाटील यांना ३८९ मते तर अनुसूचित जाती जमाती मतदारसंघातील माणिकचंद वाघमारे यांना ५०९ मते मिळाले असून ते विजय झाले आहे सर्वसाधारण गटातील परिवर्तन पॅनेलचे उमेदवार राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते व प्रांतिक सदस्य बाबुराव गायकवाड यांना ३६४ मते मिळाली. त्यांचा अल्पशामताने पराभव झाल्याने राष्ट्रवादी काँग्रेस शिवसेना शिंदे गट काँग्रेस भाजपा या पक्षाच्या कार्यकर्त्यात शोककळा बसलेली दिसून आली. या पक्षातील सर्व नेत्यांना बाबुराव गायकवाड यांचा पराभव जिव्हारी लागला आहे

सोसायटी मतदार संघातील शेतकरी विकास आघाडीचे विजयी उमेदवार आबासाहेब ज्ञानू आलदर ७५३ मते बाळासाहेब निवृत्ती काटकर ७४१ मते विनायकराव अनंतराव कुलकर्णी ७५४ मते अमोल मुरलीधर खरात ७४३ मते धनाजी गणपत पवार ७५५ मते हेमंत कुमार साहेबराव शिंदे ७४८ मते विष्णू नामदेव सरगर ७४८ मते इतर मागास प्रवर्ग मधून दीपक बाळासो घोडके ७८९ मते भटक्या विमुक्त गटातून संतोष हरिदास देवकते ७९२ तर महिला राखीव गटातून प्रमिला शिवाजी चौगुले ८०१ मते शोभा विजय पवार ८१८ मते मिळवून हे विजय झाले आहे तर यापूर्वी हमाल तोलार गटातून शेतकरी विकास आघाडीचे दगडू गावडे हे बिनविरोध विजयी झाले आहेत.

परिवर्तन पॅनेल व इतर विरोधकांना पराभूत झालेले उमेदवार योगेश कोळपे १५८ मते गणेश घाडगे १८९ नागेश जोशी १९ सचिन नारनवर १८५ धनंजय पवार अकरा मोहन पवार १६ दामोदर बागल १७७ दगडू बाबर ३२ बाळासो बाबर १७७ लक्ष्मण माळी सात बंडोपंत लांडगे १७७ संजय लेंडवे १५५ शोभा इमडे २१४ संतोष करांडे २१८ गोरख एजगर १८८ नागेश जोशी ग्रामपंचायत गटातून चार सचिन नारनवर व सुभाष भोसले ९७ शिवाजी हातेकर २२८ विजय सुपेकर २५ मते मिळाली आहेत.

शेतकरी विकास आघाडीचे १८ उमेदवार विजयी झाले. त्यामध्ये शेकापचे १२, राष्ट्रवादीचे ३, शिवसेना शिंदे गटाचे २ त्यामध्ये एक उमेदवार काँग्रेसचा आहे. तर भाजपचा एक उमेदवार विजयी होऊन कृषी उत्पन्न बाजार समिती त भाजपाने प्रथमच चंचू प्रवेश केला. विजय उमेदवारात जल्लोष होता परंतु त्या त्या पक्षाच्या नेत्यांमध्ये मात्र निराशा दिसून येत होती. शेकापने स्वतंत्र निवडणूक लढवली असती तर १८ उमेदवार विजयी झाले असते असे अनेक नेते मत व्यक्त करीत होते. तर राष्ट्रवादी, शिवसेना शिंदे गट भाजपा कार्यकर्त्यात बाबुराव गायकवाड यांचा पराभव झाल्याने नाराजी दिसून येत होती.

## मंदिराजवळ रिक्षा चालकास रॉड व काठीने मारहाण



**सोलापूर :** रिक्षा स्टॉप येथे नंबर लावण्याच्या कारणावरून रिक्षा चालकास लोखंडी रॉड, काठी आणि लाथाबुक्क्याने मारहाण करून गंभीर जखमी करण्यात आले. ही घटना अक्कलकोट येथील स्वामी समर्थ मंदिराजवळ रविवारी सकाळच्या सुमारास घडली .

रवी अप्पाशा माने (वय २४ रा.बेडरगल्ली, अक्कलकोट) असे जखमी झालेल्या रिक्षा चालकाचे नाव आहे. त्याला अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात आप्पाशा (वडील) यांनी दाखल केले. आज सकाळी १० वाजेच्या सुमारास स्टॉपवर रिक्षाचे नंबर लावण्याचा कारणावरून अन्य रिक्षा चालकात भांडण झाले होते. त्यावेळी हनुमंत मीनगले, परशुराम मीनगले आणि इतर ६ जणांनी मिळून त्याला बेदम मारहाण केली, अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.



## चिखली येथे जयंती उत्सवाची सांगता

**चिखली :** ढोल ताशाचा गजर... लेझीमचा ठेका... डीजेचा घनदाट ... फटाक्यांची आतषबाजी... छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, यांचा जयघोष... आकर्षक सजावटीत विराजमान डॉ बाबासाहेब आंबेडकरांची मिरवणूकीतील प्रतिमा... व्याख्यान... स्नेहभोजन... भीमगीते आदी कार्यक्रमांनी मोहोळ तालुक्यातील चिखली येथील विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंती उत्सवाची सांगता मिरवणूकीने करण्यात आली .

या मिरवणुकीचा शुभारंभ मोहोळ पोलीस ठाण्याकडील एपीआय डुणगे यांच्या हस्ते करण्यात आला . यावेळी एपीआय राजकुमार डुणगे , पीएसआय मारुती लोंढे, पोलिस हवालदार शरद ढावरे, उद्योगपती रामभाऊ (तात्या) कदम , यांचा सत्कार जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष योगेश सिरसट यांच्या हस्ते करण्यात आला. हजारो भीमसैनिक, आबालवृद्ध महिला वर्ग यांनी मिरवणूकीत सहभागी होऊन जल्लोष केला . राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष संतोष मते, मुंबई पोलीस बंडू सिरसट, उद्योगपती महेशजी मते, माजी सरपंच सज्जन वाघमोडे, हणमंत चौधरी, कल्याण यादव, अनिल सिरसट, पोलीस पाटील विठ्ठल मते, सरपंच ग्रामपंचायत सदस्य , तसेच पदाधिकारी व इतर समाज बांधवांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. मिरवणूकीत भीम नगर मधील बाळू सिरसट, राजन सिरसट, प्रविण सिरसट, तानाजी सिरसट, पवन सिरसट, राणा सिरसट, अतुल सिरसट, विलास सिरसट, अमोल गवळी, सुर्यभान गवळी, मुकींद सिरसट, संदीप जगताप, आकाश सिरसट, दिलीप जवंजाळ, सनी सिरसट, नोमिनाथ सिरसट, संजय सिरसट, सुनिल सिरसट, संतोष गवळी, प्रकाश जवंजाळ, अक्षय मोरे, गोरख सिरसट, संदीप सिरसट, महाविर सिरसट, सचिन सिरसट, संतोष सिरसट, उमेश सिरसट, हणमंत सिरसट, साहेब गवळी, भारत सिरसट, लक्ष्मण सिरसट, मोहोन सिरसट, आदींसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## इनामदार गुरुजी पुण्यतिथीनिमित्त धार्मिक कार्यक्रम भक्तीभावात



**सोलापूर :** सोलापूर व परिसरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री सद्गुरु प्रभाकर स्वामी महाराज यांचे परमशिष्य श्री दिगंबर पांडुरंग इनामदार गुरुजी यांच्या ३९ व्या पुण्यतिथीनिमित्त रविवारी धार्मिक कार्यक्रम भक्तिमय वातावरणात झाले. सम्राट चौक येथील सद्गुरु श्री प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात हे कार्यक्रम झाले.

रविवारी सकाळी गुरुगीता पारायणाची समाप्ती करण्यात आली. यानंतर दुपारी १२ वाजेपर्यंत भजने सादर झाली. दुपारी १२ वाजता आरती व गुलालाचा कार्यक्रम झाला. यानंतर शेकडो भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. इनामदार गुरुजी यांच्या पुण्यतिथीनिमित्त रविवारी दर्शनाकरिता भाविकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. याप्रसंगी श्री सद्गुरु प्रभाकर स्वामी महाराज मंदिर ट्रस्टचे चीफ ट्रस्टी दत्तात्रय देशमुख, मॅनेजिंग ट्रस्टी बाळकृष्ण शिंगाडे, ट्रस्टी उदय वैद्य वसंत बंडगर, ट्रस्टी सदस्य वामन वाघचौरे, मोहन बोड्डू, रवी गुंड, सम्राट राऊत, रमेश देशमुख, रामभाऊ कटकधोंड, प्रभाकर कुलकर्णी, सुभाष बद्दूरकर, मंदिराचे व्यवस्थापक निरंजन दंतकाळे, मुरली मार्गम आदी उपस्थित होते.

## क्यू आर कोडला परस्पर बँक खाते जोडले; गुन्हा दाखल

**सोलापूर :** मेडिकल मधील व्यावहाराकरीता असलेल्या क्यू आर कोडला संमतीशिवाय स्वता:चे बँक खाते जोडून ते पैसे आपल्या खात्यावर घेतल्या प्रकरणी इसमावर गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत डॉ.विनोद बलभीम कोल्हापूरे (वय-४३, रा. दक्षिण सदर बाझार) यांच्या फिर्यादीवरून महादेव शंकर कलशेट्टी (रा.भवानी पेठ) याच्यावर जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. यात एकूण १० लाखाची फसवणूक झाल्याचा गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी डॉ. कोल्हापूरे यांच्या स्वराज मेडिकल मधील ऑनलाईन व्यवहाराकरीता वापरलेले क्युआर कोडला आरोपी कलशेट्टी याने स्वताचे खाते जोडले. तसेच मेडिकलच्या दैनंदिन व्यवहारातील पैसे २०१८ पासून अद्यापपर्यंत फिर्यादीस न सांगता खात्यावर जमा करून घेऊन त्यांची फसवणूक केली. अशा प्रकारे आरोपी आता पर्यंत एकूण दहा लाख रुपये परस्पर घेऊन फसवणूक केल्याची फिर्याद डॉ. कोल्हापूरे यांनी दिली आहे. या फिर्यादीवरून महादेव कलशेट्टी याच्यावर गुन्हावर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोसई ताकभाते हे करीत आहेत.

## जलसमृद्ध उपक्रमात भारतीय जैन संघटना प्रशासनास सह्योग करणार

**सोलापूर :** महाराष्ट्र शासन राज्यांतील २८ जिल्ह्यामधील प्रतेकी १०० खेड्यातील गाव तलावातील गाळ काढून शेतकऱ्यांना मोफत देणार आहे ब ह्या कामास भारतीय जैन संघटना सह्योग करणार आहे. या कामा मुळे खेडयातील पाणी साठा व गावाची पाणी पातळी वाढेल व शेतकऱ्यांची जमीन देखील सुपीक होणार आहे. आज रोजी राज्याचे अप्पर मुख्य सचिव नंदकुमार (मृदु व जलसंधारण) हे सोलापूर दौऱ्यावर आले असताना नियोजन भवन येथे बिजेएस तर्फे शाल, मोतिमाळा व नेपकीन बास्केट देऊन सन्मान व स्वागत राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य व जिल्हा समनव्यक केतनभाई शहा व सागर शहा यांच्या हस्ते करण्यात आला.

या प्रसंगी डायस वर जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, उपजिल्हाधिकारी देशमुख मॅडम व जिल्हा जलसंधारण अधिकारी दामा साहेब उपस्थित होते. सचिव नंदकुमार साहेबानी कामाची सुरुवात लवकर करा पावसापूर्वी कामे झाल्यास ग्रामस्थांना फायदा होईल अशी सूचना दिली. भारतीय जैन संघटनेच्या राज्य कार्यकारिणी सदस्य संतोष बंब, प्रीती श्रीराम, आशिष धुमाळ, अशोक भालेराव, प्रशांत वर्धमाने, अंगराज आगरखेडे, प्रमोद कलशेट्टी, विशाल गायकवाड, संतोष घोलप आदी पदाधिकारी उपस्थित होते.



# पंढरपूर तालुक्यातील तब्बल १४३ प्रकरणे लोकअदालतमध्ये निकाली



## ३ कोटी १७ लाख रुपयांची वसुली

सुराज्य/पंढरपूर

**रविवार ३० एप्रिल, रोजी जिल्हा न्यायालय, पंढरपूर येथे लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये तब्बल १४३ प्रकरणे तडजोडीअंती निकाली झाले व त्यामध्ये ३ कोटी १७ लाख ८४ हजार ४१ रुपये वसुली करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश एम. बी. लंबे यांनी दिली.**



प्रथम लोकअदातीचे उद्‌घाटन करण्यात आले व लोकांमध्ये लोकअदालतीमध्ये लोकअदालतीचे असणारी महत्वाची माहिती देण्यात आली. सदर प्रसंगी पंढरपूर अधिवक्ता संघाचे उपाध्यक्ष एम. एम. नाईकनवरे व सचिव राहुल बोडके उपस्थित होते.

लोकअदालतीसाठी एकूण ४ पॅनलची व्यवस्था करण्यात आली होती. त्यामध्ये पॅनल क्रमांक १ मध्ये एम. बी. लंबे, जिल्हा न्यायाधीश-१, पंढरपूर, पॅनल क्रमांक २ मध्ये एस. एच. इनामदार, सह. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर, पॅनल क्रमांक ३ मध्ये ए. आर. यादव, सह. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पंढरपूर, पॅनल क्रमांक ४ मध्ये श्रीमती एस. ए. साळुंखे, ५ वे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पंढरपूर वयांनी काम पाहिले.

सदर लोकअदालतीस विधीज्ञ, बँक कर्मचारी, न्यायालयीन कर्मचारी, महावितरणचे अधिकारी व पक्षकार मोठया संख्येने उपस्थित होते.

### महाराष्ट्र दिनी जिल्ह्यात ९ ठिकाणी

# हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्यांचे लोकार्पण

सुराज्य/सोलापूर

नागरिकांना आरोग्याच्या मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी राज्य शासनाने हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजना सुरू केली आहे. राज्यातील शहरी भागातील जनसामान्य गोरगरीब झोपडपट्टी भागात राहणाऱ्या नागरिकांसाठी वेळेवर व भक्कम आरोग्य सुविधा मिळाव्यात, यासाठी घोषित करण्यात आलेल्या या योजनेचे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून लोकार्पण करण्यात येणार आहे. जिल्ह्यात ९ ठिकाणी आपले दवाखाने सुरू करण्यात आले आहेत. महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून हे दवाखाने नागरिकांच्या सेवेत समर्पित करण्यात आले.

जिल्ह्यातील आपला दवाखाना ठिकाणे पुढीलप्रमाणे - अक्कलकोट शहर - अक्कलकोट नगर परिषद नगरपालिका मराठी शाळा माणिक पेठ अक्कलकोट, बार्शी शहर - बार्शी नगरपरिषद लोढा प्लॉट बार्शी, माढा शहर - कुर्डूवाडी नगरपरिषद नागरिक आरोग्य केंद्र कुर्डूवाडी, माळशिरस - माळशिरस नगरपंचायत नगरपंचायत इमारती आवार माळशिरस, मंगळवेढा शहर - मंगळवेढा




नगरपरिषद योग भवन नाका मंगळवेढा, मोहोळ शहर - मोहोळ नगरपरिषद दत्त मंगल हॉल मोहोळ, पंढरपूर शहर - पंढरपूर नगरपरिषद क्लॉक रूम सांगोला नाका पंढरपूर. सांगोला शहर - सांगोला नगरपरिषद जि. प. शाळा चांदोलीवाडी सांगोला.

'आपला दवाखाना' मध्ये बाह्य रुग्णसेवा, मोफत औषधोपचार, ३० प्रकारच्या प्रयोग शाळा चाचण्या, मोफत कार्यशाळा तपासणी, टेलि कन्सल्टेशन, गर्भवती माताची तपासणी, लसीकरणच्या सेवा देण्यात येणार आहेत. तसेच या व्यतिरिक्त नेत्र तपासणी, बाह्य यंत्रणेद्वारे रक्त तपासणीची सोय मानसिक आरोग्यासाठी समुपदेशन सेवा, आवश्यकतेनुसार विशेषता संदर्भ सेवा, योगा व व्यायामबाबतीचे प्रात्यक्षिक देखील करण्यात येणार आहेत.



## 'वालचंद'चे १९ विद्यार्थी जेईई ॲडव्हान्ससाठी पात्र

सुराज्य/सोलापूर : एप्रिल-२०२३ मध्ये घेण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या जेईई परीक्षेचा निकाल लागला असून त्यामध्ये वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड सायन्सच्या १९ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. जेईई मेन सत्र २ परीक्षेमध्ये यश प्राप्त केलेले गुणवंत विद्यार्थी पुढीलप्रमाणे असून कंसातील आकडे त्यांना मिळालेली पर्सेन्टाईल गुण आहेत. शिवशरण कडबगाव (९८.५२), गौरव ढवणे (९७.६७), शिवशरण सांजवद (९५.४३), वैष्णवी चाबुकस्वार (९५.०८), सामी कोलारकर ( ९२.८९), निहारिका मंगलपल्ली, अरमान शेख, सोहम माळी, नवल मेरगू, भाग्यलक्ष्मी कळी, श्रुती दिवटे, अथर्व पतंगे, समर्थ गांगजी, रिद्धी माळी, प्रज्ञा भूदत्त, वैष्णवी इंगळे, सुमित कदम, विकास शिंदे, रितेश कुचेकर या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या सर्व विश्वस्तांनी अभिनंदन केले. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे आणि समन्वयक सारिका महिंद्रकर यांच्या उपस्थितीत झाला.



## यावलीत युगपुरुष मंडळातर्फे डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त मिरवणूक

सुराज्य/मोहोळ : यावली (ता. मोहोळ) येथे युगपुरुष विकास तरुण मंडळाच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या कार्यक्रमाची मिरवणुकीने सांगता करण्यात आली. यावेळी मोहोळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून मिरवणुकीच्या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी रिपाइंचे जिल्हा कोषाध्यक्ष विठ्ठल क्षीरसागर, युवक आघाडीचे तालुका अध्यक्ष तात्यासाहेब काळे, दिलीप कारंडे, सज्जान सिरसट, अनिल सिरसट, मनिष शेळके, मारुती राऊत, वैजिनाथ जाधव, आबासाहेब कुचेकर, केदार कांबळे आदी मान्यवर प्रमुख उपस्थित होते. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची रथातून मिरवणूक काढण्यात आली. यात प्रमोद कारंडे-पाटील, अभिजित दळवे, शहाजान मणेरी, शशिकांत जाधव, राजू जगताप, अजय चंदनशिवे आदीसह ग्रामस्थ सहभागी झाले होते. अमोल जगताप, दाजी जगताप, अक्षय जगताप, भीमसैनिक यांनी परिश्रम घेतले.

## 'के. एम. सी. चॅरिटेबल ट्रस्टतर्फे बुधवारी हज प्रशिक्षण शिबिर

सुराज्य/सोलापूर : के. एम. सी. चॅरिटेबल अँड वेल्फेअर ट्रस्ट, सोलापूर व सोलापूर जिल्हा खादीमुल हुज्जाज हज कमेटी यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि. ३ मे २०२३ रोजी सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत के. एम. सी. गार्डन, सोशल हायस्कूल समोर, मुस्लीम पाच्छा पेठ, सोलापूर येथे एक दिवसीय हज प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे. सदर एक दिवसीय हज प्रशिक्षण शिबिरामध्ये उमराह कसे करावे, अहराम कसे बांधावे, तवाफ कसे करावे, रमल कसे करावे, इस्तबा कसे करो, सफा मरवाहची सही - कशी करावी, हजची नियत कशी करावी, मिना, अरफात, मुजदलीफा मध्ये काय करावे, रमी जमरात कशी करावी, कुर्बानी कुठे करावी, हलक कसे करावे अशा सखोल धार्मिक विधींचे प्रशिक्षण व प्रात्यक्षिक हज तज्ञ हाजी उस्मान जमादार हे मार्गदर्शन करणार आहे. तरी सोलापूर शहर व जिल्ह्यातील तमाम हज यात्रेला जाणारे हज यात्रेकरूंनी सदरहू प्रशिक्षणासाठी वेळेवर उपस्थित राहून याचा लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष मुबीन डॉ. बशीर सय्यद यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी संपर्क : मुबीन सय्यद (८६०००००९०४), हाजी युनूस शेख (९०२८९६१६४८) व शफीक रचभरे (९९६०००९९८०) यांच्याशी संपर्क साधावा.

## रोख रक्कम असलेली बॅग पळवली

सुराज्य/सोलापूर : ७० फूट रोड येथील अथर्व एंटरप्राइजेस या ऑफिसमध्ये अज्ञात चोरट्याने प्रवेश करून खुर्चीवर ठेवलेली ५० हजार रुपये रोख रक्कम असलेली काळी बॅग चोरट्याने चोरून नेली आहे.

ही घटना २९ एप्रिल रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी शिवशंकर किसन वंगारी (वय-३७, रा. सोनिया नगर, जुना विडी घरकुल) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोसई बादोले हे करीत आहेत.

# विधायक मार्गाने पुढे जाण्यासाठी सामाजिक कार्याची गरज : आर्वे

सुराज्य/सोलापूर

'अलिकडे जातीय आणि धार्मिक द्वेष वाढला जात आहे. सोशल मिडियात हेट स्पिच करून तरूणांची माथी भडकावली जात आहेत. त्यासाठी तरूणांना विधायक मार्गाने पुढे जाण्यासाठी सामाजिक कार्याची गरज असल्याचे प्रतिपादन सहाय्यक पोलीस आयुक्त दीपक आर्वे यांनी केले. श्री साई समर्थ फाउंडेशन महाराष्ट्र राज्य राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान सोहळा श्राविकाश्रम संस्थेच्या रावसाहेब निम्बर्गीकर सभागृहात संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी सुरुवातीला प्रथम सर्व मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले.

या राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळयास व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून अरिहंत शुगर इंडस्ट्रीज जैनापुरचे

### २१ मान्यवरांचा पुरस्कार देऊन सन्मान



जनरल मॅनेजर सुभाष चौगुले, प्रा. अजित माणिकशेटे, श्री साई समर्थ फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष हिंदुराव ढवळे, भारत इंगवले, संतोष ढवळे, राजेंद्र होटकर आदी मान्यवर उपस्थित होते. २१ मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

या पुरस्काराचे स्वरूप सन्मान चिन्ह आणि शाल असे होते.

सूत्रसंचालन प्राध्यापक अरुणकुमार धुमाळ यांनी केले तर आभार प्रदर्शन हिंदुराव ढवळे यांनी मानले. या कार्यक्रमास प्रशालेचे मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, उपमुख्याध्यापिका आश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांची उपस्थिती होती. राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यासाठी अनुप कस्तुरे, सुहास छंचुरे, अविनाश मुळकुटकर, मनोज शहापुरे, सुनील बाबरे, गणेश सग्गम, अनिल भालेराव, सागर गडदे यांनी परिश्रम घेतले. राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त मान्यवर हर्षवर्धन शहा, जयश्री स्वामी, अफरोज बागवान, सुनंदा डांगे, संतोष अडसूळ, श्याम पाटील ,महादेव सवाई सर्जे, डॉ आनंद अस्वर, सुखदेव बनसोडे, रत्नप्रभा माणिकशेटे, माणिक राऊत, श्रीकृष्ण ढेपे, मनोज व्हटकर, सुनंदा दळवी, बापूसाहेब भडंगे, सिराज शेख, चंद्रकांत शिंदे, नीलम जिद्दीमनी, शुभांगी सोनवणे, मनोज देवकर, डॉ. प्रवीण सिंग गिरासे, शुभांगी पाटील असे २१ पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.




# पशुवैद्यकांनी अद्ययावत तंत्रज्ञान अंगिकृत केले पाहिजे : मुकणे

सुराज्य/पंढरपूर

पशूंची सेवा - सुशृषा करत असताना आपण पशु हा आपल्या घरातील एक सदस्य आहे. या भावनेने उपचार करतो. यात एकाग्र होऊन कार्य करतो. आता विज्ञानातील वाढत्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून घेण्यासाठी पशुवैद्यकांनी पशुंवर उपचाराचे कार्य करताना अद्यावत तंत्रज्ञान अंगीकृत केले पाहिजे.' असे प्रतिपादन पुण्यातील पशुसंवर्धन विभागाचे अतिरिक्त आयुक्त डॉ.शीतल मुकणे यांनी केले.

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींग व ज्येष्ठ पशुवैद्यक प्रतिष्ठान, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने स्वेरीच्या इंटरनॅशनल कॉन्फरन्स हॉलमध्ये जागतिक पशुवैद्यक दिनानिमित्त आयोजिलेल्या कार्यक्रमात पुण्यातील पशुसंवर्धन विभागाचे अतिरिक्त आयुक्त डॉ. शीतल मुकणे हे प्रमुख पाहणे म्हणून मार्गदर्शन करत होते.

पुणे विभागाच्या पशुसंवर्धन विभागातील सहआयुक्त डॉ. संतोष पंचपोर हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. सहआयुक्त डॉ. सत्यवान भिंगारे यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सांगून पाहुण्यांचे स्वागत केले. पंढरपूरमधील ज्येष्ठ पशुवैद्यक प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. विश्वासराव मोरे यांनी प्रस्तावना केली.

पहिल्या सत्रात पशुंमधील रक्त तपासणी निष्कर्ष व अनुमान याबाबत शंका-समाधानपर व्याख्यान झाले. यामध्ये सांगलीचे विषयतज्ञ डॉ. विजय ढोके व माजी सह आयुक्त डॉ. महेश बनसोडे यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. माजी सहायक आयुक्त डॉ. अरविंद देशपांडे यांना स्व. डॉ. सुहास देशपांडे जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. उत्कृष्ट पशुवैद्यक पुरस्कार म्हणून कासेगावचे डॉ. प्रवीण जाधव, आंधळगावचे डॉ.तानाजी भोसले, भोसे येथील पशुधन पर्यवेक्षक अर्जुन बाड, मंगळवेढा येथील डॉ. समाधान माळी या चौघांना देण्यात आला.

यावेळी साताऱ्यामधील पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. अंकुश परिहार, सोलापूरमधील पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. भास्कर पराडे, कराडमधील तालुका पशुचिकित्सालयाचे सहाय्यक आयुक्त डॉ. दिनकर बोर्डे, डॉ. प्रियांका जाधव-कोळेकर, मंगळवेढ्याचे पशुधन विकास अधिकारी डॉ. ब्रह्मदेव कदम, डॉ. मदने, डॉ. गायकवाड, डॉ. पवार, डॉ.आय. डी. शेख, डॉ. वायबसे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. सविता दुधभाते यांनी केले तर डॉ. सदानंद टाकणे यांनी आभार मानले.

## मुलांमुलींसाठी निवासी व्यक्तिमत्त्व विकास शिबीर

सुराज्य/सोलापूर : विवेकानंद केंद्र कन्याकुमारी सोलापूर शाखेने सहावी ते आठवीच्या मुली व मुलांसाठी निवासी व्यक्तिमत्त्व विकास शिबिराचे आयोजन केल्याची माहिती शिबिरप्रमुख समृद्धी गवंडी यांनी दिली आहे. १० ते १४ मे या कालावधीत मेहता प्रशाला, जुळे सोलापूर येथे शिबिर होणार आहे. या शिबिरात मुलांमधील कुतुहल, कलाकौशल्ये, साहसी वृत्ती, संवेदनशीलता यासह अनेक क्षमतांना वाव आणि त्यांच्या विकासाला दिशा देण्याचा प्रयत्न राहणार आहे. त्यासाठी विविध सत्रांसह मैदानी खेळ, सूर्यनमस्कार, योगासने, हस्तकला, चित्रकला यासह विविध विषयांवर स्लाईड शो, गटचर्चा व व्याख्यानांचे आयोजन केले आहे. १० मे रोजी सकाळी ९ वाजता या शिबिराला सुरुवात होणार आहे. १४ मे रोजी या शिबिराचा समारोप होणार आहे. यासाठी नोंदणीची अंतिम मुदत ५ मे पर्यंत आहे. इच्छुकांनी विवेकानंद केंद्र, १६५, रेल्वे लाईन, सोलापूर येथे (०२१७-२३१५९४९) नोंदणी करावी, असे आवाहन शिबिर प्रमुख समृद्धी गवंडी यांनी केले आहे.



## उजनी कॅनॉलमधील बेवारस मृतदेहावर अंत्यसंस्कार

### कोरवली येथील म. बसवेश्वर सामाजिक समितीच्या कार्यकर्त्यांचा पुढाकार

सुराज्य/विरवडे बु. : मोहोळ तालुक्यातील परमेश्वर पिंपरी येथील उजनी कॅनॉलमध्ये दि. २८ एप्रिल रोजी सकाळी ११ च्या दरम्यान पाण्यावर पुरुषाचा मृतदेह तरंगत असल्याचे स्थानिकांना आढळून आले. बेवारस मृतदेहाचे शव विच्छेदन करून कामती येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

कामती पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश माने यांना ही माहिती दिली. त्यांनी सहकाऱ्यांच्या तसेच स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने मृतदेह काढून ते कामती येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आणून ठेवले.

अंदाजे ३५ ते ४० वय वर्षाच्या या बेवारस मृतदेहाच्या अंगात करड्या रंगाचा अंडरवियर असून शरीर बांधा अत्यंत मजबूत आहे. कोरीलेली काळी दाढी, डोक्याला काळे कमी केस, हातामध्ये लाल रंगाचा दोऱ्याचा गोफ अशा वर्णनाचा मृतदेह आहे. कोणीही ओळख पटवून ते बेवारस मृतदेह घेऊन गेले नसल्याने, कामती पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार जीवराज कासविद यांनी कोरवली येथील महात्मा बसवेश्वर सामाजिक समितीच्या कार्यकर्त्यांना याची माहिती देऊन मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यास सांगितले. यावेळी पोलीस हवालदार जीवराज कासविद, सिद्धाराम म्हमाणे, संजय कस्तुरे, अमोगसिद्ध सुतार, बाळासाहेब नंदुरे, काशिनाथ म्हमाणे, जेसीबी चालक अभिजित सावंत, विठ्ठल ओहोळ, नागेश गायकवाड उपस्थित होते.

# संभाजीराव शाळेच्या गेट समोरून दुचाकी लंपास

सुराज्य/सोलापूर

जुनी मिल कंपाऊंड येथे संभाजीराव शाळेच्या गेट जवळ मोकळ्या जागेत हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्र.एम.एच.४५.वाय. ५७१४ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. ही घटना २३ एप्रिल रोजी रात्री पावणे नऊ ते पावणे बारा वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी अक्षय अर्जुन सोनवणे (वय-२८, रा. बालाजी अपार्टमेंट, गणेश नगर) याने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्याच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पोळ हे करीत आहेत.

**विवाहितेचा छळ ; तिघांवर गुन्हा**

विवाहितेला लग्नाच्या एका महिन्यानंतर सासरकडील लोकांनी घरगुती कारणावरून वारंवार विवाहितेस शिवीगाळ करून मानसिक त्रास देत मारहाण केली.तसेच वडिलांकडून कर्ज फेडण्यासाठी तसेच उपजीविकेसाठी एक लाख रुपये घेऊन ये म्हणून विवाहितेचा मानसिक छळ केला आहे. ही घटना दि. २१ जुलै २०२१ रोजीच्या एक महिन्यानंतर ते दि.२७ जुलै २०२२ पर्यंत गुलबर्गा राज्य कर्नाटक येथे घडली. अशा आशयाची फिर्याद मिसबा नजमोद्दीन शेख (वय-२२, रा. सिद्धेश्वर नगर, मजरेवाडी) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून सासू मल्लेका, सासरे नजामोद्दीन, पती नजमोद्दीन (सर्व. रा. गुलबर्गा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल मणुरे हे करीत आहेत.



**दुचाकी गहाणवट ठेवल्याप्रकरणी एकावर गुन्हा**

फिर्यादी संतोष महादेव शिवशरण (वय-३०, रा. सम्राट चौक) यांचा विश्वास संपादन करून दुचाकी क्र. एमएच.१३. डीपी.६२१४ ही संशयित आरोपी सागर हरी तिवारी (रा. विजापूर) याने चार दिवसांकरिता फिरवण्यासाठी दुचाकी घेऊन जातो, असे सांगून आठ दिवसांनी फिर्यादी यांना फोन करून गाडी आणून देतो असे सांगितले. मात्र, सागर याने फिर्यादी यांची दुचाकी परत न केल्याने फिर्यादी हे विजापूर येथे गेले असता, त्यावेळी सागर याने फिर्यादी यांची दुचाकी विजापूर येथील सावकार यांच्याकडे गहाणवट ठेवली आहे व परत देतो असे सांगितले. परंतु अद्यापपर्यंत फिर्यादी यांची दुचाकी परत दिली नसून, फिर्यादीच्या सहमतीशिवाय परस्पर अपहार केला आहे, असे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल भोसले हे करीत आहेत.



## श्री म्हसोबा यात्रेत मनोरंजनाला फाटा देत रंगला कुस्तीचा आखाडा

**उ. सोलापूर** : तिर्हेचे ग्रामदैवत श्री म्हसोबा यात्रेत धार्मिक, पारंपरिक कार्यक्रमासह पहिल्यांदाच मनोरंजनात्मक कार्यक्रमाला फाटा देत जिल्हास्तरीय जंगी कुस्त्या घेण्यात आल्या. छत्रपती शंभुराजे तालीम येथे पूजन करून कुस्ती स्पर्धे ची सुरुवात झाली.पैलवान विकास धोत्रे (श्रीकृष्ण आखाडा) व किशोर पाटील (बेनापूर सांगली) यांची अंतिम कुस्ती बाळासाहेब सुरवसे, भारत जाधव यांच्या हस्ते लावण्यात आली.राज्य स्तरीय महाराष्ट्र केसरी पैलवान समाधान घोडके, महाराष्ट्र केसरी नितीन खुर्द, भरत मेकाले ,दत्तात्रय लोणारकर यांची विशेष उपस्थिती होती.स्पर्धा १०० रुपये पासून ते कुस्ती ५१ हजार रुपयांची झाली. पंच म्हणून पैलवान शंकर जाधव, दिगंबर सोनटक्के, रामकाका जाधव, शिवाजी काशीद, श्रीरंग गवळी,प्रताप मल्लाव, महादेव सुरवसे यांनी पाहिले.नवुदादा सुरवसे, हंसध्वज जाधव, शंकर जाधव,भास्कर बापु सुरवसे, किशोर जाधव,पार्थवीर बापू सुरवसे, ए पी आय आनंद थिटे, सरपंच नेताजी सुरवसे यांच्या हस्ते लहान व मध्यम कुस्ती स्पर्धा लावण्यात आली.यावेळी उपसरपंच मारुती लवटे,अजय सोनटक्के,गोवर्धन जगताप,अनिल गवळी,संदीप सुरवसे,अनिल गायकवाड,माऊली वाघमारे यांच्यासह पंच कमिटी,छत्रपती शंभुराजे तालीम संघाने कुस्ती स्पर्धा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.



## मार्डी येथे लग्नकार्यासाठी कौटुंबिक साहित्य वाटप

**उ. सोलापूर** : उत्तर सोलापूर तालुक्यातील मार्डी येथे भाजप कार्यकारणी सदस्य शहाजी पवार यांच्या हस्ते येथील मोनाली नामदेव शिरसट यांच्या कन्येच्या लग्नासाठी लागणारी सर्व भांडी, ज्ञानेश्वर इनामदार यांची सुकन्या कार्तिकी इनामदार हिस इंजिनीअरिंगच्या शिक्षणासाठी सरकारी बँकेमधून शैक्षणिक कर्ज उपलब्ध करून दिले. हॉस्टेलची पूर्ण फी शहाजी पवार यांनी स्वखर्चातून देवू केली आहे. यावेळी भाजप उत्तर तालुकाध्यक्ष काशिनाथ कदम, कमलाकर माने, मल्हारी काळे, युवराज पवार, गणेश पवार, अंबीर बोंगे, अझर शेख, लक्ष्मण बनसोडे, देवीदास मिसाळ, अमोल बोराडे, दिपक गिरे, भानुदास बोराडे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.




## हालहळ्ळीतील हनुमान यात्रेत ४२ जणांचे रक्तदान

**अक्कलकोट** : हालहळी अ (ता.अक्कलकोट) येथील ग्रामदैवत हनुमान यात्रा महोत्सव व स्व.सचिन वळदड्डे यांच्या स्मृतीनिमित्त जय हनुमान नूतन नाट्य संघ,महात्मा बसवेश्वर बहुउद्देशीय तरुण मंडळ, गौरीलक्ष्मी विचार मंच, ग्रामपंचायतीच्या वतीने घेतलेल्या शिबिरात ४२ जणांनी रक्तदान केले. यावेळी सरपंच प्रकाश बिराजदार, तंटामुक्तीचे अध्यक्ष गुरुनाथ कळमंडे, पोलिस पाटील मल्लिकार्जुन पाटील, प्रगतशील शेतकरी गंगाधर वळदड्डे,द्राक्ष बागायतदार महादेव वळदड्डे, मर्चंड नेव्हीचे अधिकारी नागनाथ हुक्केरी, बसवराज बिराजदार, विश्वनाथ बिराजदार, श्रीशैल फताटे, मारुती बिराजदार, श्रीशैल ढब्बे, नागय्या स्वामी, गुरुनाथ गोविंदे, चंद्रकांत बिराजदार, विजयकुमार बिराजदार,भिमसैन बिराजदार, मल्लिनाथ बिराजदार, नागनाथ मुगळी, नागनाथ कळमंडे, सचिन बिराजदार, शिवानंद ढब्बे, नागेश गाडेकर, नागनाथ जवळेकर, काशिनाथ बिराजदार, बसण्णा धनशेट्टी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन मारुती बिराजदार यांनी केले. यात्रा कालावधीत भाविकांसाठी गंगाधर वळदड्डे यांनी तीन दिवस जारच्या पाण्याची सोय केली होती.

## पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत पिलीव येथील १९ विद्यार्थ्यांचे यश

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील जि प प्राथमिक केंद्र शाळेतील १९ विदयार्थयानी पुर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती ( पाचवी ) परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन केले यामध्ये यश संपादन करणारे विदयार्थी (१) रुद्र सुहास कोल्हे (२८६),(२) विराज खरात (२६२),(३) हर्षवर्धन नष्टे (२५६), (४) शिवानी ढोले (२५०),(५) श्रावणी तावरे (२३०),(६) ज्ञानदा मगर (१९८) (७) वैभवी लोखंडे (१८८) (८) हर्षल बोडरे (१८८), (९) आलीया तांबोळी (१८८),(१०) वैष्णवी गिते (१८६), (११) दुर्गाश्री पवार (१८४),(१२) राजलक्ष्मी सुर्यवंशी (१७८),(१३) यज्ञेश काळे (१७८), (१४) प्रथमेश दडस (१७०),(१५) राजवीर मगर (१६८),(१६) सार्थक देशमुख (१५४),(१७) दिगविजय जामदार (१४४),(१८) आसद मुलाणी (१३४) (१९) आनंदी नष्टे (१३२) यामध्ये इयत्ता पाचवीमधील सर्वच विदयार्थी पात्र झाले असुन निकाल शंभर टक्के लागला आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना वैशाली प्रकाश भागवत (फलके) मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले .सर्व यशस्वी विदयार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे माळशिरस पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी धनंजय देशमुख, विस्तार अधिकारी करडे,माजी कृषी व पशुसंवर्धन सभापती संग्रामसिंह जहागिरदार, माजी जि प सदस्य गणेशदादा पाटील, सरपंच नितीन मोहीते, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अँड वैभव मेथवडे ,केंद्र प्रमुख राजकुमार फासे, मुख्याध्यापक यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर यांच्या कडून अभिनंदन व कौतुक होत आहे.





# बणजगोळच्या अड्डपालखी महोत्सवात एकतेचा संदेश

सुराज्य/अक्कलकोट

**बणजगोळ (ता. अक्कलकोट) येथील ग्रामदैवत मल्लिकार्जुन मंदिराच्या कळसारोहण समारंभानिमित्त काढण्यात आलेल्या काशी जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामी यांच्या अड्डपालखी सोहळ्यात एकतेचे दर्शन घडले. ग्रामस्थांनी या सोहळ्यात माणुसकी एकच धर्म असल्याचे दाखवून दिले.**

पारंपारिक वाद्यांसह ५०० सुवासिनींच्या जलकुंभ मिरवणुकीने जगद्गुरुंचा अड्डपालखी सोहळा काढण्यात आला. डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामी यांनी मानवता एकच धर्म आहे. एकमेकांना मदत करुन आपल्यातील मतभेदाची दरी कमी करा. भेदाभेद विसरुन एकतेचा संदेश द्या. स्वत:बरोबरच देशाच्या विकासासाठी एकत्र या. एकत्र येऊन विकास साधण्यातच खरी सार्थकता आहे, असे सांगितले. यावेळी सद्गुरु हवा मल्लिनाथ महाराज, मनिप्र बसवलिंग महास्वामी, शांतवीर शिवाचार्य, विरंतेश्वर महास्वामी, अभिनव बसवलिंग महास्वामी, मडिवाळेश्वर महास्वामी, आ. सचिन कल्याणशेट्टी, माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, गोकुळ शुगरचे अध्यक्ष दत्ता शिंदे, जिल्हा परिषदेचे माजी विरोधी पक्षनेता आनंद तानवडे, शशिकांत पेडसंगे, यात्रा कमिटीचे अध्यक्ष मल्लिनाथ पाटील, उपाध्यक्ष सुरेश मुळे, शिवानंद पेडसंगे, रत्नकांत व्हसुरे, अरुण मुळे, सरपंच राम मातोळे, मुत्तण्णा गुरव, गडेप्पा व्हसुरे, दयानंद रायोजी, गंगाराम रायोजी, श्रीशैल पेडसंगे, सुरेश तळवार, शिवानंद नरके, सचिन मसाले, अमृत मुळे आदी उपस्थित होते. महिनाभर धर्मसंकीर्तन कार्यक्रमासह चार दिवस चालेल्या यात्रा महोत्सवात रक्तदान शिबिर, कुस्त्या पार पडल्या. दोन दिवस झालेल्या कुडक कट्टीद ताळी' (दारुड्याने बांधले मंगळसूत्र') या नाटकाला चांगला प्रतिसाद मिळाला.

# क्रेडिट कार्डचा नंबर घेऊन १ लाख ४० हजार रुपयांची फसवणूक

सुराज्य/कुर्डूवाडी

लऊळ (ता. माढा) येथील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे क्रेडिट कार्डचा नंबर घेऊन अज्ञात व्यक्तीने १ लाख ३८ हजार १७३ रुपयांची फसवणूक केली. ही घटना दि. २३ एप्रिल रोजी समोर आली. कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात सेवानिवृत्त कर्मचारी नामदेव पन्हाळकर (रा.लऊळ ता.माढा) यांनी फिर्याद दाखल केली आहे.

सेवानिवृत्त कर्मचारी पन्हाळकर यांनी फिर्यादित म्हटले आहे की, २९ जुलै २०२२ रोजी सकाळी ११. ३० वाजता ८२६०३९६६२० या नंबर वरून फोन आला. क्रेडिट कार्डचे तुम्हाला ६ हजार रुपये चार्ज आले आहे. मी क्रेडिट कार्ड वापरत नाही. त्यानंतर त्याचा मला ८२४७६८००९४ या अनोखी नंबर वरून फोन करून क्रेडिट कार्ड वापरत नसाल तर ते बंद करण्यासाठी कार्ड नंबर सांगा. फोनवरील व्यक्तीने तुमच्या अकाउंट मधील १ लाख ४० हजार काढून घेईल. त्यामुळे मी त्यांना माझा क्रेडिट कार्ड नंबर दिला. नंतर काही वेळातच याची खात्री करण्यासाठी भारतीय स्टेट बँक शाखा कुर्डूवाडी येथे आलो बँकेचे मॅनेजरला भेटलो त्यांना क्रेडिट कार्ड बंद करण्याबाबत सांगितले. कार्ड वरील नंबर वर फोन केला परंतु कार्ड बंद झाले नाही. म्हणून मी माझ्या खात्यावरील असलेले १ लाख ४० हजार रुपये काढून घेतले.

त्यानंतर नोव्हेंबर २०२२ रोजी मला भारतीय स्टेट बँक सोलापूर येथून वसुली अधिकारी यांचा फोन आला. तुम्ही आमच्या बँकेचे थकितदार तुम्ही १ लाख ४० हजार रुपये भरा त्यावर मी क्रेडिट कार्ड वापरत नाही असे त्यांना सांगितले. स्टेट बँक मध्ये क्रेडिट कार्ड स्टेटमेंट मागणीसाठी गेलो परंतु त्यांनी मला पुणे येथील क्रेडिट कार्ड ऑफिस मध्ये जाण्यास सांगितले. दि. २३ एप्रिल २०२३ रोजी पुणे येथील क्रेडिट कार्ड स्टेटमेंट घेऊन आलो असता. त्यामध्ये एकूण १ लाख ३८ हजार १७३ रुपये क्रेडिट कार्ड वरून कट झाल्याचे दिसले. परंतु पैसे कट झाल्याचा कोणतेही संदेश माझ्या फोनवर आला नव्हता. त्यामुळे ही गोष्टी माझ्या लक्षात आली नाही. क्रेडिट कार्ड स्टेटमेंट पाहिले असतात त्यावेळी माझी खात्री झाली. मला फोन करून अज्ञात इसमाने क्रेडिट कार्ड नंबर घेऊन माझी फसवणूक केली. म्हणून कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात फिर्यादीवरून अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल फिर्याद दाखल केली आहे .

## सापटणे येथे रोख रकमेसह सव्वालाखांचे दागिने गायब

**सोलापूर** : उघड्या घरात प्रवेश करून चोरट्याने कपाटातील रोख रकमेसह १ लाख २८ हजाराचे दागिने पळविले . ही धाडसी चोरी सापटणे (ता.माढा ) येथे शनिवारी दुपारच्या सुमारास घडली . यासंदर्भात संग्राम बाळासाहेब रंदवे (रा. सापटणे) यांनी टेंभुर्णी पोलिसात फिर्याद दाखल केली . त्याप्रमाणे पोलिसांनी अनोळखी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. काल दुपारी २ ते ५ वाजेच्या सुमारास चोरट्याने संग्राम रंदवे यांच्या घरात प्रवेश केला. आणि कपाटातील ३ हजार रुपये रोख, ३० ग्रॅम सोन्याचे दागिने आणि इतर चांदीचे साहित्य असा ऐवज चोरून नेला. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे.

## दीपकआबांनी सिल्वर ओकवर घेतली पवारांची भेट

**सांगोला** : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष खा.शरद पवार यांची मुंबईतील त्यांच्या सिल्वर ओक या निवासस्थानी महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष,माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील यांनी भेट घेतली, या भेटीदरम्यान विविध मुद्द्यावर सविस्तर चर्चा संपन्न झाली.

सध्या अवकाळी पावसामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर शेतीचे व फळबागाचे नुकसान झाले आहे त्याची नुकसान भरपाई शासनाकडून त्वरित मिळावी या मागणीचे निवेदन व झालेल्या नुकसानाचा आढावा यावेळी साहेबांना देण्यात आला. तसेच अखिल भारतीय लोणारी समाजाच्या वतीने नुकतेच कसबा विधानसभा पोटनिवडणुकीमध्ये निवडून आलेले आ.रवींद्र धंगेकर यांचा सत्कार समारंभ खा.शरद पवार यांच्या हस्ते होणार आहे.

त्या कार्यक्रमाच्या बाबतीत सविस्तर चर्चा या ठिकाणी दोघांमध्ये झाली. अलीकडच्या काळामध्ये संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांचे तेल्या रोग व मर रोगामुळे या भागातील शेतकऱ्यांचे फळबागांचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे हे नुकसान लक्षात घेता मेडशिंगी ता. सांगोला येथे डॉ.अजयसिंह इंगवले यांनी जैविकॉन राजलक्ष्मी ऑरगॅनिक या संस्थेमार्फत माती, पाणी, देठ, पान,फुल परीक्षण रिसर्च सेंटरची उभारणी केली आहे.या रिसर्च सेंटरचे उद्घाटन खा.शरद पवार यांच्या हस्ते करावयाच्या बाबतीत दोघांमध्ये सविस्तर चर्चा झाली. सांगोला तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते बाबुराव गायकवाड यांच्या अमृत महोत्सवी निमित्त खा.शरद पवार यांच्या हस्ते त्यांचा अभिष्टचिंतन सोहळा घेण्याच्या वेळेबाबतही सकारात्मक सविस्तर चर्चा यावेळी दोघांमध्ये झाली.



## कुर्डूवाडीत स्वामी समर्थ पालखीचे उत्साहात स्वागत

सुराज्य/कुर्डूवाडी

अक्कलकोट येथील स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ यांच्या वतीने स्वामी समर्थांच्या पादुकांच्या पालखी परिक्रम सोहळा पालखीचे स्वागत शिवसेना जिल्हाप्रमुख धनंजय डिकोळे यांच्या हस्ते करण्यात आले.

त्यावेळेस स्वामी समर्थ बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष सोनवर, शिवप्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष संजय टोणपे, जगन्नाथ क्षिरसागर, सुहास शहा, चंद्रकांत गवळी, राम ताकभाते, अमोल रजपूत आदी मान्यवर स्वागतास उपस्थितीत होते.

स्वामींच्या पादुकांची पालखीतुन शहरातील प्रमुख मार्गावरून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. हजारो भाविक चौकाचौकांत दर्शनासाठी येत होते. पटेल चौक येथे ह. भ. प. जयंत करंदीकर यांचे प्रवचन व विठ्ठल शुगरचे कार्यकारी संचालक यशवंत शिंदे यांच्या शुभहस्ते आरती करण्यात आली. अन्नदान महाप्रसाद नंतर सांगता झाली. दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजता गणेश जगताप यांच्या पत्नी सुप्रिया आणि संकेत सोनवर यांच्या पत्नी रंजना यांच्या हस्ते सपत्नीक स्वामींची उत्तरपूजा होऊन पालखी पुढील मार्गासाठी रवाना झाली.

यावेळी पालखी आण्णा पांढरे, संकेत सोनवर, दुर्गेश सोनवर, सागर कोले, रोहित पवार, योगेश वाघमोडे, आकाश पांढरे, शुभम वाघमोडे, स्वप्निल वाघमोडे, विजय येळे, विजय सोनवर, प्रमोद येळे, रामा खांडेकर, सौरभ येळे, युवराज कोळी, गणेश ठावरे, अमोल ठावरे, अनिल सोनवर, क्षितिज टोणपे, सुनील सोनवर, रोहन वाघमारे, राहुल मिठारी, शंकर बागल, आकाश येळे, शिवराज घाडगे, अभी काळे, प्रसाद आतकर, ऋषिकेश क्षिरसागर, चैतन्य बामणे, अमन तांबोळी, प्रशांत सोनवर, शुभम गव्हाणे, महेश पाटणे, आकाश गव्हाणे, गणेश जगताप, शरद शिंदे, शंभू दास, सुनील भंडारे, नाना लोंढे, मच्छिंद्र कदम, अमोल घोडके, दिनकर टोणपे लालासाहेब टोणपे, अतुल जोशी, कुमार दळवी इत्यादी स्वामी भक्तांनी परिश्रम घेतले.

## विरवडे (बु) येथे फवारणी पंपाचे वाटप

सुराज्य/विरवडे बु।।





भारत कृषी सेवा या कंपनीच्या वतीने एक सामाजिक बांधिलकी म्हणून मोहोळ तालुक्यातील विरवडे बु येथील गरजू शेतकऱ्यांना शेती साहित्य वाटप करण्यात आले.

गावचे ग्रामदैवत श्री हनुमंतरायाच्या पूजनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. भारत कृषी सेवेचे सीईओ आणि कार्यकारी संचालक शरयू लांडे मॅडम हे शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सदैव तत्पर असतात आणि एक महिला उद्योजक म्हणून यांना अनेक सन्मान प्राप्त झाले आहेत. याप्रसंगी कंपनीच्या असणाऱ्या विविध सेवा आणि योजना याविषयी कंपनी चे व्हॉईस व्हाईस प्रेसिडेंट विरभद्र गोगे यांनी शेतकऱ्यांना सखोल माहिती दिली. यावेळी कांहीं शेतकऱ्यांना फवारणीचे कृषी पंप हे एम एन मेहता चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने व अग्रिओ सोलुशन चे फवारणी किट डायमईन्स अँड केमिकल्स लिमिटेड तर्फे भारत कृषी सेवा कंपनी च्या माध्यमातून गरजू शेतकऱ्यांना मोफत देण्यात आले. यावेळी अग्रीओ सोल्युशन कंपनीचे अनिल बीराडे यांनी शेकर्यांनी कंपन्याच्या औषधविषयी माहिती दिली ,तसेच भारत कृषी सेवा चे किरण राठोड व गावचे सरपंच सचिन पाटील, माजी केंद्रप्रमुख अशोक गुरुजी अवताडे, संजू अवताडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सचिन मिसाळ यांनी केले आणि कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# मंगळवेढा महोत्सवानिमित्त सोमवारपासून विविध कार्यक्रम

सुराज्य/मंगळवेढा

शिक्षण प्रसारक मंडळ,मंगळवेढाचे संस्थापक अध्यक्ष दलितमित्र कदम गुरुजी यांच्या पुण्यतिथीनिमित्त सोमवार दि.१ ते गुरुवार दि.४ मे २०२३ दरम्यान मंगळवेढा महोत्सव २०२३ चे आयोजन केले असल्याची माहिती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड.सुजीत कदम यांनी दिली.





सोमवार दि.१ मे रोजी दुपारी ४.०० वा. दलितमित्र स्व.कदम गुरुजी व स्व.ताडआप्पा यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गावरून निघणार आहे.समाजभूषण डॉ.शिवाजीराव पवार यांच्या हस्ते या मिरवणूकीचे उदघाटन होणार असून यावेळी खरेदी विक्री संघाचे चेअरमन सिध्देश्वर आवताडे,मुख्याधिकारी निशिकांत प्रचंडराव आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

मंगळवार दि.२ मे रोजी सकाळी ८.०० वा. कृषी-क्रीडा ज्योत दौड व सायकल रॅलीचे उदघाटन दामाजी शुगर्सचे माजी चेअरमन ॲड.नंदकुमार पवार यांच्या हस्ते जिल्हा नियोजन समितीचे सदस्य अजित जगताप यांच्या उपस्थितीत होईल.मंगळवारी सकाळी १०.०० वा. भव्य रक्तदान शिबीर आयोजीत केले असून युवा उदयोजक संजय आवताडे यांच्या हस्ते या शिबीराचे उदघाटन होत असून डॉ.शरद शिर्के व डॉ.प्रिती शिर्के यावेळी उपस्थित राहणार आहेत. इंग्लिश स्कूल,आंबे चिंचोली प्रशालेने या रक्तदान शिबीराचे नियोजन केले आहे.मंगळवारी सायंकाळी ६.०० वा. सुरसंगम प्रस्तूत मराठी-हिंदी गीतांचा कराओके शो आयोजित केला असून खासदार डॉ.जयसिध्देश्वर महास्वामी यांच्या हस्ते या शोचे उदघाटन होत असून युवा उदयोजक पवन महाडिक,डॉ. नितीन तोष्णीवाल आदी मान्यवर यावेळी उपस्थित राहणारआहेत.

मंगळवेढा महोत्सव २०२३ च्या यशस्वीतेसाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड.सुजीत कदम,उपाध्यक्ष डॉ.सुभाषराव कदम,सचिवा प्रियदर्शनी कदम-महाडिक,संचालिका डॉ.मिनाक्षी कदम,प्रा. तेजस्विनी कदम,संचालक श्रीधर भोसले,राम नेहरवे,संचालिका सौ.अजिता भोसले,संचालक ॲड.शिवाजीराव पाटील,अमीरहमजा भालदार,यतिराज वाकळे यांचे मार्गदर्शनाखाली इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य आर.एस.काशिद,उपप्राचार्या तेजस्विनी कदम,बेगमपूर प्रशालेचे प्राचार्य के. सी.भोसले,भोसे प्रशालेचे प्राचार्य जे.डी. आलदर,वेळापूर प्रशालेचे प्राचार्य आर.बी.पवार,नरखेडचे मुख्याध्यापक ए.डी.शिंदे,आंबे चिंचोलीचे मुख्याध्यापक एस.व्ही.बाबर,इंग्लिश स्कूल मंगळवेढाचे उपमुख्याध्यापक एस.एम.नागणे,वेळापूर प्रशालेचे उपमुख्याध्यापक एस.व्ही. खंदारे,पर्यवेक्षक ई.एस.काझी,डी. जे. चंदनशिवे,एस.व्ही.माने,बेगमपूर प्रशालेचे पर्यवेक्षक एम.बी.कोरे,वेळापूर प्रशालेचे पर्यवेक्षक पी.एम.शिवशरण तसेच दलितमित्र कदम गुरुजी सायन्स कॉलेज,शिवतेज प्राथमिक शाळेचे सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

# लुधियानात गॅस गळती, २ मुलांसह ११ जणांचा मृत्यू

## दूध घेण्यास गेलेला प्रत्येकजण बेशुद्ध

✔ **लुधियाना** : पंजाबच्या लुधियानामध्ये रविवारी सकाळी गॅस गळती झाली, यात ११ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये पाच महिला, चार पुरुष आणि दोन मुलांचा समावेश आहे. लहान मुलांचे वय १० ते १३ वर्षे आहे. ही घटना लुधियाना शहराजवळील ग्यासपुरा इंडिस्ट्रियल एरियाजवळ एका इमारतीमध्ये घडली आहे. लुधियानाच्या एसडीएम स्वाती यांनी सांगितले, की सकाळी ७.१५ वाजता येथे गॅस गळती झाली. यानंतर १२ जण बेशुद्ध पडले.








घटनास्थळी मेडिकल स्टाफ, फायर ब्रिगेड, पोलिस आणि छ्ज्क्ष ची टीम दाखल झाली आहे. जखमींना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. येथील स्थानिक आमदार राजिंदरपाल कौर म्हणाल्या की या इमारतीमध्ये एक दुध डेअरी सुरु आहे. जो कोणी सकाळी दूध घेण्यासाठी गेला तो बेशुद्ध झाला. प्रशासनाने या इमारतीपासून एक किलोमीटरचा परिसर सीलबंद केला आहे.

रहिवासी भागात असलेल्या या इमारतीत गॅस गळती झाली आहे. इमारतीच्या ३०० मीटर परिसरातील लोकांना याची बाधा झाली आहे. अनेक लोक बेशुद्ध झाले आहेत. इमारतीच्या आसपास असलेली घरे आणि ढाब्यांवर असलेले लोकही बेशुद्ध झाले आहेत. प्रशासनाने ड्रोनच्या मदतीने सर्च ऑपरेशन सुरु केले आहे. लुधियानाचे पोलिस आयुक्त मनदीप सिद्धू म्हणाले, ज्या इमारतीत गॅस गळती झाली आहे, तेथील सर्व लोकांना बाहेर काढले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गॅस गळती झाली आहे. मात्र कोणता गॅस लिक झाला याची अद्याप माहिती मिळालेली नाही. प्राथमिक माहितीनुसार, गॅसची दुर्गंधी ही सीवरेज गॅससारखी असल्याचे सांगण्यात आले. नेमका कोणता गॅस लिक झाला होता, ज्यामुळेही दुर्घटना झाली याचा तपास करण्यासाठी यंत्रणा घटनास्थळी पोहोचली आहे.

पोलिस आयुक्त सिद्धू म्हमाले, ड्रेनेजमधील गॅसमध्ये ॲसिड असल्यामुळेही असे होऊ शकते. किंवा यात काही केमिकल आहेत का याचाही तपास केला जात आहे. वास्तविक संपूर्ण तपासानंतरच ही घटना का आणि कशामुळे घडली हे समोर येईल.



## रत्नागिरीत ११ मे पर्यंत मनाई; चाकरमानी हैराण

✔ **बारसू** : बारसू येथील प्रस्तावित रिफायनरी प्रकल्पावरून जोरदार राजकारणाचे वारे वाहत आहेत. या रिफायनरीवरून राजकिय नेतेमंडळी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत आहेत. अशातच सरकारने येत्या ११ मेपर्यंत रत्नागिरीत मनाई आदेश लागू केले आहेत. त्यामुळे या रिफायनरीच्या वादाचा फटका आता कोकणात जाणाऱ्या प्रवाशांना बसण्याची शक्यता आहे.

मे महिन्याच्या सुट्टीचा आनंद लुटण्यासाठी सर्वांनी कोकणाची वाट धरली आहे. मुंबईसह राज्याच्या अनेक भागांतून चाकरमानी कोकणात जात आहेत. कोकणाचे सौंदर्य डोळ्यांत टीपण्यासाठी रेल्वे गाड्याही प्रवाशी आणि पर्यटकांनी भरून जात आहेत. मात्र, मनाई आदेशामुळे कोकणात जाणारे चाकरमानी संताप व्यक्त करत आहेत.

बारसू (राजापूर) येथे सुरू असलेल्या माती परीक्षण प्रक्रियेला होणारा विरोध, १ मे या कामगार दिनाच्या अनुषंगाने विविध ठिकाणी होणारी आंदोलने, ५ मे रोजी बौद्ध पौर्णिमा सण या अनुषंगाने किरकोळ कारणावरून कोणताही अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी आजपासून ११ मे पर्यंत जिल्ह्यात महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आला आहे.

## सलग सुट्ट्यांमुळे फळभाजी, पालेभाजीच्या मागणीत घट

✔ सुराज्य/पुणे



सलग सुट्ट्यांमुळे फळभाज्या आणि पालेभाज्यांना फारशी मागणी नाही, त्यामुळे बहुतांश फळभाज्या आणि पालेभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

गुलटेकडी येथील श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डात रविवारी (३० एप्रिल) राज्य, तसेच परराज्यांतून ९० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. गुजरात, कर्नाटकमधून मिळून ६ टेम्पो हिरवी मिरची, गुजरात, कर्नाटकमधून मिळून ५ टेम्पो कोबी, हिमाचल प्रदेशातून ५ ट्रक मटार, आंध्रप्रदेश आणि तमिळनाडूतून ३ टेम्पो शेवगा, कर्नाटकातून २ टेम्पो घेवडा, आंध्रप्रदेश आणि कर्नाटकातून मिळून तोतापुरी कैरी ५ टेम्पो, मध्य प्रदेश आणि गुजरातमधून मिळून १५ ट्रक लसूण, आग्रा, इंदूर, तसेच पुणे विभागातून मिळून ४० ट्रक बटाटा आवक झाली, अशी माहिती घाऊक बाजारातील प्रमुख आडते विलास भुजबळ यांनी दिली.

पुणे विभागातून सातारी आले दीड हजार गोणी, टोमॅटो ८ हजार पेटी, हिरवी मिरची ३ टेम्पो, फ्लॉवर १० टेम्पो, कोबी ५ टेम्पो, भेंडी ५ टेम्पो, गवार ५ टेम्पो, शेवगा ३ टेम्पो, काकडी ८ टेम्पो, ढोबळी मिरची १० ते १२ टेम्पो, गाजर ६ टेम्पो, तांबडा भोपळा १० टेम्पो, मटार १०० गोणी, कांदा १०० ट्रक अशी आवक झाली.

## बाजार समिती निवडणुकीत राडा

### भाजप आमदार गोपीचंद पडळकरांची ग्रामपंचायत सदस्याला मारहाण

✔ **सांगली** : आटपाडी कृषि उत्पन्न बाजार समिती निवडणुकीत राडा झाला आहे. भारतीय जनता पक्षाचे विधानपरिषदेतील आमदार गोपीचंद पडळकर यांनी एका ग्राम पंचायत सदस्याच्या कानशिलात लगावली आहे.



आटपाडी कृषि उत्पन्न बाजार समितीसाठी आज सकाळी ८ वाजता मतदानाला सुरुवात झाली. अतिशय चुरशीने येथे मतदान सुरु आहे. सत्ताधारी भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीच्या विरोधात शिवसेना (शिंदे गट), काँग्रेस, राष्ट्रीय समाज पक्ष यांच्यात संघर्ष पाहायला मिळत आहे. आटपाडी येथील मतदान केंद्रावर सकाळपासून मतदारांनी रांगा लावल्या आहेत. दुपारी १२ पर्यंत येथे ७० टक्के मतदान झाले.

त्याआधी सकाळी ११ वाजता विरोधी गटांमध्ये बाचाबाची झाली. यावेळी भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी काळेवाडी ग्रामपंचायत सदस्य मंगेश सस्ते यांच्या कानशिलात लगावली. यामुळे काहीवेळ वातावरण तंग झाले होते. दोन्ही बाजूचे कार्यकर्ते आमनेसामने आले. आटपाडी बसस्थानकासमोर असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत मतदान केंद्र आहे. मतदान केंद्राबाहेर जवळपास दोन किलोमीटरपर्यंत रस्त्यांच्या दुतर्फा चारचाकी आणि दुचाकी वाहनांची रांग लागली आहे. यामुळे येणाऱ्या-जाणाऱ्यांना मोठा अडथळा होत आहे. एसटी बसेसलाही बसस्थानकात जाण्यात अडचणींचे ठरत आहे. पोलिस अधिकारी पद्मा कद, पोलिस निरीक्षक शरद मेमाणे हे मतदान केंद्रावर हजर आहेत. त्यासोबतच मोठा बंदोबस्तही तैनात करण्यात आला आहे.



## पंतप्रधान मोदींनी आमच्या ‘मन की बात’ ऐकावी

✔ **नवी दिल्ली** : अखिल भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण सिंह यांच्यावर महिला कुस्तीगिरांनी लैंगिक शोषणाचा आरोप केला आहे. त्याप्रकरणी ब्रिजभूषण सिंह यांच्याविरोधात दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पण, ब्रिजभूषण सिंह यांच्या अटकेची मागणी करत गेल्या आठ दिवसांपासून दिल्लीतील जंतरमंतर मैदानावर कुस्तीगीर आंदोलन करत आहे. (३० एप्रिल) कुस्तीगिर बजरंग पुनिया, विनेश फोगाट आणि साक्षी मलिक यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधत न्यायाची अपेक्षा व्यक्त केली आहे. बजरंग पुनियाने सांगितलं की, जोपर्यंत न्याय मिळत नाही, तोपर्यंत आमची लढाई सुरू राहणार आहे. आमचा न्यायालयावर पूर्ण विश्वास आहे. पण, कुस्ती महासंघाचे काही लोक या आंदोलनाला वेगळं वळण देण्याचं काम करत आहेत.

## मुंबई गोवा महामार्गावर बसला अपघात

✔ **रायगड** : मुंबई गोवा महार्गावर रायगड जिल्ह्यात महाड एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीतील चांढवे टोल नाक्याजवळ रविवारी पहाटे पावणे तीनच्या वाजता खासगी बसला अपघात झाला. ड्राइवरचे नियंत्रण सुटून लक्झरी बस डिव्हायडरवर धडकली आणि टायर फुटून उलटल्याने मोठा अपघात झाला. यामध्ये २२ पैकी ७ प्रवासी जखमी झाले आहेत. यात कुठलीही जीविहानी न झालेली नाही. यामुळे मोठा अनर्थ टळल्याचं बोललं जात आहे. अपघातावेळी लक्झरी बसमध्ये एकूण बावीस प्रवाशी होते. अपघात झाल्याची माहिती मिळताच महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याचे निरीक्षक मारुती आंधळे यांच्यासह पोलीस पथकाने घटनास्थळी तात्काळ धाव घेतली. बसमध्ये अडकलेल्या सर्व प्रवाशांना बाहेर काढण्यात आले. या प्रवाशांपैकी ७ प्रवासी जखमी झाले होते. जखमी प्रवाशांना तात्काळ महाड येथील दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तर त्यापैकी तिघांना उपचारानंतर डिस्चार्ज देण्यात आला आहे. तर उर्वरीत ४ जणांना पुढील उपचारासाठी मुंबई येथे पाठविण्यात आले आहे. अन्य प्रवाशांना दुसरी बस बोलावून त्यामध्ये बसवून त्यांचा घरी सुखरुप पाठविण्यात आले आहे. सबंधित लक्झरी ड्राइवर विरुद्ध महाड एमयडीसी पोलीस ठाण्यात भा. द. वी. कलम २७९, ३३७, ३३८, सहकलम १८४ मोटार वाहन कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील कारवाई सुरू आहे.

## एन्रॉन प्रकल्पात भ्रष्टाचार झाल्याचे सांगत शरद पवार अन् अजित पवारांनी सांगितला ‘तो’ घटनाक्रम

✔ **मुंबई** : ऑईल रिफायनरी प्रकल्प नाणारला होणार होता. पण, तिथे विरोध झाल्याने बारसूची जागा निवडली आहे. मी देखील बारसूला जाण्याचा प्रयत्न करणार आहे. तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी राजन साळवी यांचा बारसूच्या प्रकल्पाला पाठिंबा आहे. विकासाच्याबाबत सत्ता कोणाचीही असो किंवा नसो. सर्वांनी सकारात्मक रित्या पाहिलं पाहिजे. सरकारने संवेदनशील मार्गाने हा प्रश्न सोडवायला हवा, असा सल्ला विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी दिला आहे. ते पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

बारसू प्रकल्पासंदर्भात शरद पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा केली आहे. उदय सामंत यांच्याशी माझं बोलणं झालं आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संपर्क साधत, स्थानिक लोकांचा किती विरोध आहे. किती संघटना आंदोलनात उतरल्या आहेत. बाहेरची कितीजण आंदोलनात आले आहेत, याची माहिती घेणार आहे. काही मोठ्या प्रकल्पाला विरोध होत असतो. पण, चर्चेतून मार्ग काढल्यावर तो विरोध मावळतो. समृद्ध महामार्ग याचं उदाहरण आहे, असं अजित पवारांनी सांगितलं.



राज्यात बेरोजगारी आणि महागाई वाढली आहे. बेरोजगारी दूर करायची असेल, तर मोठे प्रकल्प आणले गेले पाहिजेत. त्याशिवाय रोजगार निर्माण होणार नाही. या प्रकल्पाच्या माध्यमातून एक लाख तरुण-तरुणींना रोजगार मिळेल, असं बोललं जातं, असं अजित पवारांनी म्हटलं.

एन्रॉन प्रकल्पाच्याबाबत असेच वातावरण खराब करण्याचा प्रयत्न झाला. तत्कालीन विरोधी पक्षाने एन्रॉन प्रकल्पात भ्रष्टाचार झाल्याचं सांगत, शरद पवार आणि तत्कालीन सरकारची प्रतिमा मलीन करण्याचं काम केलं. पण, नंतर गोपीनाथ मुंडे आणि मनोहर जोशी हेच सरकारमध्ये आले. त्यांनी एन्रॉन प्रकल्प मार्गी लावला. कुठं आंबा, काजूचं झाड खराब झालं? कुठं मासेमारीवर परिणाम झाला, असा सवाल अजित पवारांनी उपस्थित केला आहे. कोणतेही प्रकल्प येत असताना भावी पिढीचं नुकसान करण्याचा हक्क कोणालाही दिला नाही, असेही अजित पवारांनी म्हटलं आहे.

## गुळाची ढेप समजून महिलेने बॉम्ब फोडला, स्फोटात गंभीर जखमी

✔ **बिहार** : बिहारमधील बक्सर जिल्ह्यातील इटाढी पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या बालादेवा गावात शनिवारी एक धक्कादायक घटना घडली आहे. बॉम्ब फुटून येथील एक महिला जबर जखमी झाली आहे. स्थानिक रुग्णालयात योग्य उपचार होऊ न शकल्याने या महिलेला वाराणसीच्या रुग्णलयात हलवण्यात आलं. या घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार बालादेवा गावातील रामनाथ राम यांची पत्नी शांती देवी (६५) यांनी गूळ समजून बॉम्ब फोडला. या स्फोटात ती जबर जखमी झाली आहे.

या प्रकरणाची माहिती देताना पोलीस अधीक्षक मनीष कुमार म्हणाले की, ही महिला घरात काहीतरी कुटण्याचं काम करत होती. ते करत असताना अचानक स्फोट झाला. महिलेच्या घरातील सदस्यांनी सांगितलं की, शांती देवी सकाळी काहीतरी कुटण्याचं काम करत होत्या. त्यांनी पहाटे चारच्या सुमारास गडद अंधार असताना घरातलं काहीतरी साहित्य घेतलं. गुळाची ढेप समजून त्यांनी ती वस्तू कुटण्याचा प्रयत्न केला. तेव्हा मोठा स्फोट झाला. दरम्यान, तिथे अजून बॉम्ब असू शकतात, या भितीने बॉम्ब शोधक पथकाला पाचारण करण्यात आलं. परंतु या पथकाला कोणतंही स्फोटक आढळलं नाही.

# मुंबई पुणे एक्सप्रेस वेवर कार पेटली

## वाहतूककोंडीने बोरघाटात वाहनांच्या १० किमीपर्यंत रांगा

✔ सुराज्य/पुणे

**मुंबई पुणे एक्सप्रेस वेवर कारला आग लागल्याचा प्रकार समोर आला आहे. यामुळे महामार्गावर वाहतुकीची कोंडी झाली आहे. बोरघाटात तब्बल १० किमी लांब वाहनांच्या रांगा लागल्याची माहिती समोर आली आहे. ही आग एवढी भीषण होती की त्यात कार पूर्णपणे जळून खाक झाली आहे. कार पेटल्यामुळे महामार्गावर वाहतूकीची कोंडी झाली. खोपोलीजवळ पुणे लेनवर ही दुर्घटना घडली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.**

कारला आग कशामुळे लागली? याचे कारण आद्याप समोर आलेले नाही. पण कारमध्ये शॉर्ट सर्किट झाल्याने ही आग लागल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

शनिवार, रविवार व सोमवार असे सलग तीन दिवस सुट्ट्या आल्यामुळे पर्यटक मोठ्या संख्येने खासगी वाहनांमधून पर्यटनासाठी घराबाहेर पडले. यामुळे आज भल्या पहाटेपासून मुंबई पुणे एक्सप्रेस-वे जाम झाला आहे. ही वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी खंडाळा बोगदा परिसरात महामार्ग पोलिसांनी दहा-दहा मिनिटांचा ब्लॉक घेत मुंबईच्या दिशेने जाणारी वाहने थांबवत मुंबईहून पुण्याकडे जाणारी वाहने सर्व सहा लेन वरून सोडली जात आहेत.



मुंबई-पुणे लेनवरी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी पोलिसांनी प्रयत्न सुरू केले आहेत. पण दुसरीकडे पुणे-मुंबई लेनवर देखील वाहतूक कोंडी होत आहे. तर मुंबई-पुणे लेनवर खालापूर टोलनाक्यापासून खंडाळ्यापर्यंत प्रवासी वाहनांच्या रांगाच रांगा पहायला मिळत आहेत. पुढील तीन दिवस हीच परिस्थिती पहायला व अनुभवायला मिळणार आहे. भर उन्हात वाहतूककोंडी सोडवताना पोलिसांची मात्र चांगलीच दमछाक होत आहे. ही वाहतूक कोंडी आता नित्याचीच झाली असल्याची भावना प्रवासी नागरिक व्यक्त करत आहेत. यावर प्रशासनाने लवकरात लवकर तोडगा काढावा, अशी मागणी देखील आता होऊ लागली आहे.




## काय म्हणतयं? पॉलिटिक्स

# भाजपकडून मराठा समाज कायम वंचित

### आता शहराध्यक्ष पदासाठी जाधव, पिंगळे, काकडे यांच्या नावाची चर्चा

राज्यासह शहर-जिल्ह्यात मराठा समाजाची ताकद मोठी असतानाही भाजप पक्षात मात्र महत्त्वाच्या पदांपासून या समाजाला वंचित ठेवण्यात आले आहे. शहराध्यक्ष पद, महापौर, सभागृह नेते, विरोधीपक्ष नेते, स्थायी समिती सभापतिपदाचा इतिहास पाहता संख्याबळ कमी असलेल्या समाजबांधवांना ही पदे बहाल करण्यात आली. मात्र एकदाही मराठा समाजाला यापैकी एकाही महत्त्वाच्या पदावर वर्णी लावण्यात आली नाही. त्यामुळे मराठा समाजबांधवात भाजप पक्षाच्या धोरणाबाबत कमालीची नाराजी पसरली आहे. भाजपमध्ये शहराध्यक्ष बदलाचे वारे जोरदार वाहत आहे. कर्नाटक विधानसभा निवडणुकीनंतर शहरात संघटनात्मक बदल होणार असल्याचे बोलले जात आहे. याकरिता इच्छुकांनी फिल्डिंग लावण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे यंदा तरी शहराध्यक्षपद मराठा समाजाला देऊन न्याय देण्याची मागणी होत आहे. या पदासाठी हेमंत पिंगळे, अनंत जाधव, राजकुमार काकडे यांच्या नावाची चर्चा भाजपामध्ये आहे

**दीपक शेळके**

भाजप हा शिस्तप्रिय पक्ष आहे. पक्षातील सर्व पदाधिकाऱ्यांच्या निवडी लोकशाही पध्दतीने होत असतात. भाजपचे सक्रिय सभासद वॉर्ड अध्यक्षाची निवड करतात. वॉर्ड अध्यक्ष मंडल अध्यक्षांची निवड करतात. हे मंडल अध्यक्ष शहराध्यक्षाची निवड करतात. स्थानिक पातळीप्रमाणे प्रदेशपातळीवर या प्रणालीचा वापर करून पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाते. सोलापूर शहरातील एका वेळचा अपवाद वगळता प्रत्येक पदाधिकाऱ्यांची निवड एकमताने करण्याची परंपरा रूढ झाली आहे. याला शहराध्यक्षपद देखील अपवाद नाही.

काही दिवसांपूर्वी आमदार तथा प्रदेश संयोजक श्रीकांत भारतीय सोलापूर दौऱ्यावर येऊन गेले. आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी उमेदवारांची चाचणी केली. काही नेत्यांच्या त्यांनी गुप्त भेटी घेतल्या. तसेच भाजपचे प्रदेशाध्यक्ष यांच्या सोलापूर दौऱ्यावेळी विद्यमान शहराध्यक्षाच्या भाजपच्या युवा पदाधिकाऱ्यांनी तक्रारी करत शहराध्यक्ष बदलाची मागणी केली असल्याची चर्चा आहे. याला भाजपच्या एका पदाधिकाऱ्यांनी दुजोरा देखील दिला आहे. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून भाजपच्या शहराध्यक्ष पदाची भाकरी फिरवली जाणार आहे. कर्नाटक विधानसभा निवडणुकीनंतर शहरात संघटनात्मक बदल होण्याची शक्यता आहे. विद्यमान शहराध्यक्ष विक्रम देशमुख यांचा कार्यकाळ संपला आहे. त्यामुळे आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून स्थानिक पातळीवर देखील हे संघटनात्मक बदल केले जाणार आहेत.

### ... तर निवडणुकीत परिणाम भोगावे लागणार

राज्यात शिंदे फडणवीस सरकार आहे. मराठा समाजा आरक्षणावरून पुन्हा आक्रमक झाला आहे. यांचा फटका भाजला प्रत्येक निवडणुकीत बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे भाजपच्या वरिष्ठ पातळीरील नेते मंडळीनी भाजप सोबत असलेल्या मोठ्या व्होट बँकेचा विचार करून समाजाला न्याय द्यावा अन्यथा यांचे परिणाम भाजपला आगामी निवडणुकीमध्ये भोगावे लागतील असे राजकीय जाणकार सांगतात






मराठा समाज आत्तापर्यंत भाजपच्या मागे राहिला आहे. शहर उत्तर विधानसभा अर्थात माजी पालकमंत्री विजयकुमार देशमुख यांच्या मतदारसंघात दोन नंबरची मते देणारा समाज आहे. या मताच्या जोरावर आ. देशमुख यांनी चारवेळा विजश्री मिळवली आहे. तसेच याभागातील अनेक नगरसेवकांची मदार मराठा समाजाच्या मतावर राहिली आहे. मोठ्या प्रमाणात समाज असताना देखील या समाजाला न्याय आज तागायत मिळाला नाही. आता पर्यंत भाजपचे शहराध्यक्ष पद, महापौर, सभागृह नेते, विरोधीपक्ष नेते, स्थायी समिती सभापतिपदाचा इतिहास पाहता संख्याबळ कमी असलेल्या समाजबांधवांना ही पदे देऊन न्याय दिला आहे.

भाजपचा आत्तापर्यंतचा शहराध्यक्ष पदाचा इतिहास पाहता शहराध्यक्ष राचेटी हे लिंगायत समाजचे होते.त्यानंतर प्रभाकर लांडगे (धनगर समाज), गोपिकिशन भुतडा (मारवाडी), लिंगराज वल्याळ (कुरहिनशेट्टी समाज), किशोर देशपांडे (ब्राह्मण), रामचंद्र जन्नू (साळी समाज), अशोक निंबर्गी (कोळी समाज), पालिकेतली महापौर, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, स्थायी समिती सभापतींचा इतिहास पाहता मराठा समाजाला एक ही पद मिळाले नाही. महापौर लिंगराज वल्याळ (कुरहिनशेट्टी), श्रीकांचन्ना यन्नम(पद्मशाली), किशोर देशपांडे (ब्राह्मण), स्थायी समिती सभापती किशोर देशपांडे (ब्राह्मण), जगदीश पाटील (लिंगायत), मोहिनी पत्की (ब्राह्मण), सुरेश पाटील (धनगर), संजय कोळी (कोळी समाज), विरोधी पक्ष नेतेपद देखील लिंगायत, धनगर, ब्राह्मण, कोळी, साळी, ब्राम्हण, पद्मशाली समाज बांधवांच्या भोवती राहिले आहे. आत्तार्पयत मराठा समाजाला मोठ्या पदावर एकदाही संधी भाजपकडून मिळाली नाही. त्यामुळे यंदा तरी भाजप शहराध्यक्ष पद मराठा समाजाला देऊन न्याय देण्याची मागणी जोर धरू लागली आहे. यासाठी हेमंत पिंगळे, अनंत जाधव, राजकुमार साठे यांची नावे चर्चा आहेत.

# परिचारकांकडून विधानसभा निवडणुकीची साखर पेरणी



पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीवर परिचारक गटाने आपले वर्चस्व पुन्हा एकदा प्रस्थापित केले असतानाच माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीसाठी साखर पेरणी केल्याचे बोलले जात आहे.

**सूरज सरवदे**

पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत बोलताना प्रशांत परिचारक म्हणाले होते की, तुमची साथ असेल तर नक्की २०२४ ला गुलाल खेळू. या त्यांच्या प्रतिक्रियेवरून माजी आमदार प्रशांत परिचारक हे पंढरपूर विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार असतील, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे पंढरपूरच्या राजकारणात मोठी खळबळ उडून गेली आहे. पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी प्रशांत परिचारक यांनी तीन सभा घेतल्या. सभांना मोठ्या प्रमाणावर कार्यकर्त्यांची गर्दी होती. काही कार्यकर्त्यांनी विधानसभा लढवण्याची मागणी देखील थेट सभेमधून केली होती. त्यावेळी देखील 'समय से पहले और भाग्य से ज्यादा कुछ मिलता नहीं' असे म्हणत विधानसभा निवडणुकीबाबत चर्चेला वाव निर्माण करणारे वक्तव्य केले होते.

अभिजित पाटील गट कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीच्या रिंगणात उतरल्यामुळे परिचारक गटाला आलेली मरगळ प्रशांत परिचारक यांनी मोठमोठ्या सभा घेऊन बाजूला सारत विधानसभा निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी सजग राहावे, यासाठी कार्यकर्त्यांना ऊर्जा देण्याचे काम माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी सभांमधून केले.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत आमदार माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या अंगाला गुलाल लागला आहे. तोच गुलाल २०२४ पर्यंत राहणार का याकडे जाता सर्व मतदारांचे लक्ष लागून राहिले आहे.

### पंढरपूरचे आमदार होण्याचे स्वप्न पूर्ण होणार का?

प्रशांत परिचारक यांनी सोलापूर विधानपरिषदेची निवडणूक लढवली होती. त्या माध्यमातून ते विधानपरिषदेवर गेले होते. मात्र, पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व त्यांना करता आले नाही. २०१४ साली विधानसभेला त्यांचा पराभव झाला होता. तर २०१९ साली सुधाकरपंत परिचारक उभारले होते. २०२१ विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपने समाधान आवताडे यांना उमेदवारी दिली होती. ते विजयी झाले होते. त्यामुळे परिचारक यांचे पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाची आमदार होण्याचे स्वप्न हे पूर्ण होऊ शकले नाही.

# मोहिते-पाटील विरोधकांच्या मनोमीलनाचा निघाला फुसका बार



**डी.एस.गायकवाड**

अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत विजयसिंह मोहिते-पाटील पॅनलने निर्विवाद वर्चस्व मिळवीत मार्केट कमिटीवर आपलीच सत्ता कायम ठेवली. मात्र या निवडणुकीच्या निमित्ताने तालुक्यातील जवळपास सर्वच विरोधक मनोमीलन करून एकत्रित आल्याने विनाकारण तप्त वातावरण करण्याचा प्रयत्न झाला होता. मात्र त्यांच्या मनोमीलनाचा आणि एकत्रीकरणाचा फुसका बार निघाल्याची चर्चा सध्या जनतेमधून ऐकू येताना दिसत आहे.

अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीदरम्यान माळशिरस तालुक्यातील राजकीय घडामोडींना वेग आलेला दिसला. मोहिते-पाटील विरोधकांमध्ये गटातटाचे वातावरण होते. ते यानिमित्ताने संपुष्टात आल्याचे पहावयास मिळाले. त्यामुळे त्यांच्या एकत्रित येण्याने खूप मोठी ताकद निर्माण झाली आहे; असा भास निर्माण करण्यात आला. पण त्यांचा हा बार फुसका निघाला. कारण सर्व विरोधक एकत्र येऊनसुध्दा मोहिते-पाटील त्यांना भारी पडले आहेत. विरोधकांनी एवढे मोठे एकत्रीकरण करून सुध्दा एकटे उत्तमराव जानकर हेच कसे निवडून येतात; याविषयी चर्चेला उधाण आले असून जो तो स्वतःचेच पाहत असल्याने एकत्रीकरणाची नौटंकी करण्याची काय गरज होती; असेही लोक आता बोलू लागले आहेत.

भाजपचे प्रदेश पातळीवर काम करणारे के.के. पाटील यांनी तर मोहिते-पाटील यांना विरोध करण्याचा धर्म पाळला. मात्र हाती काहीच लागले नाही. एकच उमेदवार निवडून येतो आणि इतर उमेदवार पराभूत होतात. यामुळे त्यांच्यात यापुढे कधी एकतेचे निशाण फडकेल की नाही याबाबतही साशंकता निर्माण झाली आहे. मुळात सुरुवातीलाच पॅनलच्या नेतृत्वावरून ठिणगी पडली होती. तरीही मिशीवर ताव देत विरोधक विजयाच्या घोषणा करीत होते. पण शिवरत्नवरील मोहिते-पाटील यांच्या शक्तीपुढे त्यांच्या या वल्गना हवेत विरून गेल्या. फक्त टीका टिप्पणीच्या जोरावर निवडणुका जिंकल्या जाऊ शकत नाहीत हे पुन्हा एकदा सिध्द झाले आहे. एकमेव पानिवचे प्रकाश पाटील सोडले तर इतर विरोधकांच्या कोणत्याही संस्था नाहीत किंवा त्यांनी संस्था उभ्याही केल्या नाहीत. त्यामुळे फक्त निवडणुकीपुरते लोकांसमोर यायचे हे आता जनतेने विरोधकांचे धोरण पूर्णपणे ओळखलेले दिसत आहे. अनेकांचे म्हणणे असे होते की, विरोधकांमध्ये गट तट असल्याने मोहिते-पाटील यांचा विजय सुकर होतो.पण या निवडणुकीने विरोधकांची एकता होऊन सुध्दा मोहिते-पाटीलच बाजी मारतात हे सिध्द झाले आहे. त्यामुळे भविष्यात असा एकतेचा प्रयोग करून निवडणुकांना सामोरे जाणे व जिंकून येण्याच्या विरोधकांच्या आशा आता पूर्णपणे मावळल्या आहेत.

### इच्छा माझी पुरी करा...



या निवडणुकीच्या निमित्ताने विरोधकांचे झालेले मनोमीलन पाहता त्या मनोमीलनाच्या कार्यक्रमात उत्तमराव जानकर यांनी मला आमदार व्हायची खूप इच्छा असल्याचे बोलताना 'इच्छा माझी पुरी करा'ची गळ घातली होती. मात्र सर्वांना शक्य नाही. पण किमान ग्रामपंचायत विभागातील तरी उमेदवारांना निवडून आणण्यासाठी त्यांनी शर्तीचे प्रयत्न करायला हवे होते;अशी कुजबुज आता सध्या सुरू असून त्यांनी फक्त स्वतःच्याच अंगावर गुलाल घेण्यासाठी प्रयत्न केला असल्याची दबक्या आवाजात विरोधकांमध्ये चर्चा आहे. त्यामुळे त्यांची आमदार होण्याची इच्छा आता पुरी करण्यासाठी इतर नेतेमंडळी प्रयत्न करतील का असाही सवाल निर्माण होत आहे.

### के.के. पाटील पडले तोंडघशी...

या निवडणुकीत भाजपचे प्रदेश सदस्य, जिल्हा नियोजन समिती सदस्य तथा भाजपाचे सोलापूर जिल्हा सहप्रभारी के. के. पाटील यांच्या लढतीकडे सर्वांचे लक्ष लागले होते. जानकर निवडून येणार नाहीत; पण के.के. पाटील नक्की निवडून येतील, असा दावाही केला जात होता. मात्र भ्रमनिराश झाला आणि त्यांना तोंडघशी पडावे लागले. त्यांच्यासाठी ही निवडणूक म्हणजे पायावर धोंडा मारून घेतल्यासारखी झाली आहे. भाजपाच्या मोहिते-पाटील यांना विरोध करताना स्वतःचे मार्केट वाढविण्याच्या नादात त्यांनी इमेज डाऊन करून घेतली आहे.

### किंगमेकर धैर्यशील मोहिते-पाटील...

तालुक्यातील विरोधक एकत्रित आल्याने मोहिते-पाटील यांचा पराभव निश्चित आहे असे एक चित्र उभे करण्यात आले होते. पण भाजपाचे संघटन महामंत्री धैर्यशील मोहिते-पाटील यांनी राजकीय किमया साधत कार्यकर्त्यांमध्ये विश्वास निर्माण केला. अचूक नियोजन करीत विरोधकांचा करेक्ट कार्यक्रम केला. त्यामुळे या विजयाचे ते शिल्पकार ठरले आणि किंगमेकर सुद्धा...

# सोलापूरच्या राष्ट्रवादीमध्ये भाकरी फिरणार का?



भाकरी फिरवण्याची वेळ आली, ती फिरवली नाही तर करपते असे सांगून राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी राष्ट्रवादीमध्ये फेरबदलाचे संकेत दिले आहेत. या फेरबदलाचे वारे सोलापुरात वाहणार का याकडे पदाधिकाऱ्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

**अजित उंब्रजकर**

सोलापूर महापालिका निवडणूक कधीही लागू शकते. अशातच राष्ट्रवादीमध्ये फेरबदल होतील, अशी शक्यता सुरुवातीपासूनच आहे. प्रमुख पद असणारे शहराध्यक्ष ही बदलणार हे जवळपास निश्चित मानले जात आहे. या पदासाठी अनेकजण इच्छुक असून त्यांनी आपापल्या गॉडफादरमार्फत फिल्डिंगही लावली आहे. मात्र सुधीर खरटमल यांचे पारडे सध्या तरी जड वाटत आहे.

सोलापूर शहरात माजी महापौर महेश कोठे यांनी राष्ट्रवादीची वाट धरल्यानंतरच खऱ्या अर्थाने पक्षाला भरारी आली. त्यांनी सुरुवातीला सुधीर खरटमल यांचा पक्षात प्रवेश करून शहर राष्ट्रवादी आर्थिकदृष्ट्या भक्कम करण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी एका मागोमाग एक काँग्रेसचे नेते, कार्यकर्ते फोडून राष्ट्रवादी पक्षात घेतले. त्यामुळे महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी चमत्कार करून पुढील काळात महापौर बसवणार अशी शक्यता वाटत असताना राज्यात सत्तांतर झाले आणि भाजप-सेनेची सत्ता आली. त्यामुळे सध्या राष्ट्रवादीतील इनकमिंग थांबून आऊट गोईंग सुरू झाले आहे. भारत जाधव गेल्या सहा ते सात वर्षांपासून शहराध्यक्ष पदावर आहेत. मात्र त्यांना आपल्या कारकिर्दीत पक्ष वाढवता आला नाही हे सर्वज्ञात आहे. शहराध्यक्ष भारत जाधव यांची उचलबांगडी होणार असल्याचे संकेत मिळतच आहेत. जुन्या पदाधिकाऱ्यांमध्ये महेश गादेकर, मनोहर सपाटे यांनी शहराध्यक्षपद यापूर्वी भोगले आहे. जुन्या पदाधिकाऱ्यांमध्ये दिलीप कोल्हे एकमेव नेते उरले होते. त्यांच्याकडे नव्या आणि जुन्या लोकांना सोबत घेऊन जाण्याची कला होती. मात्र ते शिंदे गटात गेले आहेत. त्यामुळे आता महेश कोठे यांच्यामार्फत पक्षात प्रवेश केलेले सुधीर खरटमल यांचेही नाव शहराध्यक्ष पदासाठी चर्चिले जात आहेत. त्यामुळे पवारांनी जर भाकरी फिरवली तर खरटमल यांच्याच नावाची असणार हे जवळपास निश्चित मानले जात आहे.

# उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघात बार्शी कायम किंगमेकरच

संसदीय निवडणुकांच्या इतिहासात २००४ सालापर्यंत उस्मानाबाद लोकसभा मतदार संघ हा आरक्षित राहिला आहे. २००९ नंतर हा मतदारसंघ खुला झाला. त्यावेळीपासून या मतदारसंघात बार्शी विधानसभा मतदारसंघ कायमच किंगमेकर राहिल्याचे दिसून येत आहे. उस्मानाबादची लोकसभा निवडणूक लढवणे भविष्यात भाजप-सेना युती आणि महाआघाडीसमोर मोठे आव्हान आहे. आगामी निवडणुकीत या मतदार संघात मोठा राजकीय संघर्ष करण्याची तयारी असलेल्या मातब्बर उमेदवारालाच संधी मिळू शकते. बार्शी मतदार संघात हा उमेदवार असेल का? याबाबत बार्शीकरांमध्ये उत्सुकता आहे.

**सचिन अपसिंगकर**

१९९७ व १९९९ साली झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत बार्शीच्या शिवाजी कांबळे यांनी शिवसेनेच्या वतीने दोन वेळा खासदारकी पटकावली. शिवाजी कांबळे यांनी मौनी बाबा अशी प्रतिमा झालेल्या उदगीरच्या अरविंद कांबळे यांचा पराभव केला. शिवाजी कांबळे यांनी खासदारकीच्या कार्यकाळात बार्शी विधानसभा मतदार संघातही आपले स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या पत्नी सरला कांबळे यांना बार्शी शहराच्या नगराध्यक्ष पद भूषविण्याची संधी मिळाली. मात्र कांबळे फारसे स्थान निर्माण करू शकले नाही. त्यांनी कळंब मतदार संघातही विधानसभेची निवडणूक लढविली. कांबळे बापूंचे पक्षांतर यशस्वी ठरले नाही. त्यानंतर ते राजकीय दृष्ट्या अलिप्त होत गेले. २००४ साली झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या लक्ष्मणराव ढोबळे यांचा कळंबच्या कल्पना नरहिरे यांनी पराभव केला. त्या निवडणुकीत बार्शीच्या मतदारांचा कौल महत्त्वाचा ठरला.

२००९ साली झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत डॉ.पद्मसिंह पाटील यांनी रवींद्र गायकवाड यांचा पराभव केला. त्यानंतर २०१४ साली रवींद्र गायकवाड यांनी गत निवडणुकीतील पराभवाची परतफेड केली. या दोन्ही निवडणुकीत बार्शी विधानसभा मतदार संघात लोकसभेच्या निवडणुकीला विधानसभेच्या निवडणुकीतील संघर्षाचे स्वरूप प्राप्त झाले होते. या दोन्ही निवडणुकीत सोपल आणि राऊत या दोघांना एकमेकांविरोधात झुंझावे लागले होते. त्यानंतर २०१९ साली ओमराजे निंबाळकर यांना शिवसेनेने संधी दिली. राष्ट्रवादीकडून राणा जगजितसिंह पाटील यांना उमेदवारी मिळाली. या निवडणुकीत राष्ट्रवादीत असलेले सोपल यांनी राणा पाटलांची पाठराखण केली. विद्यमान आमदार राऊत हे त्या लोकसभा निवडणुकीत भाजपात होते. त्यांनी अर्थात भाजप-शिवसेना युतीचे उमेदवार असलेले ओमराजेंचा प्रचार केला. राणांचा पराभव करून ओमराजे निवडून आले. ही निवडणूक मोदी लाटेत पूर्णपणे एकतर्फी ठरली होती. निवडून आलेल्या ओमराजेंनी गेल्या चार वर्षात उस्मानाबाद लोकसभा मतदार संघाबरोबरच बार्शी विधानसभा मतदार संघही पूर्णपणे पिंजून काढला आहे. त्यांचा बार्शी मतदार संघात थेट संपर्क आहे. जनसंपर्काची कोणतीही संधी त्यांनी दडवलेली नाही. आता लोकसभेच्या निवडणुका दृष्टिपथामध्ये आहेत. बार्शी विधानसभा मतदार संघामध्ये मिळणाऱ्या मताधिक्याला कायम महत्त्व राहिलेले आहे.

गेल्या २० वर्षात मोठ्या प्रादेशिक आणि राष्ट्रीय पक्षाकडून बार्शी मतदार संघातील निवासी कार्यकर्त्याला उमेदवारीची संधी देण्यात आलेली नाही. या मतदार संघात इतर समाजांबरोबरच मराठा आणि लिंगायत समाजाच्या मतदानाला विशेष महत्त्व राहिलेले आहेत. उस्मानाबाद लोकसभा मतदार संघात उमरग्याचे आमदार ज्ञानराज चौगुले शिंदे गटात आहेत. कैलास पाटील यांना ओमराजेंनी ठाकरे गटात टिकवून ठेवले आहे. भूम-परंड्याचे प्रतिनिधित्व करणारे आमदार तानाजीराव सावंत शिंदे गटात आहेत. तुळजापूरमध्ये राणा जगजितसिंह पाटील यांनी भाजपात प्रवेश करून राजकीय संधी साधली. या मतदार संघातील समीकरणे लक्षात घेतली तर उस्मानाबादची लोकसभा निवडणूक लढवणे भविष्यात मोठे आव्हान आहे.



### प्रथम भाजप लढवणार उस्मानाबाद लोकसभा?

सध्याचे खा. ओमराजे हे शिंदे गटात आहेत. त्यामुळे ते महाआघाडीकडून लढणार हे निश्चित. त्यामुळे ही जागा आता प्रथमच भाजप लढण्याची शक्यता आहे. गतवेळचे राष्ट्रवादीचे उमेदवार राणा पाटील आता भाजपाचे तुळजापूरचे आमदार आहेत. त्यामुळे ते लोकसभा लढतील की नाही याबाबत शंका आहे. त्यामुळे भाजपचा उमेदवार कोण असणार याची उत्सुकता आहे. मिळालेल्या माहितीनुसार एक महिला उमेदवारास भाजपकडून संधी मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.



## फिलगुड

शेकोटी करणारा काका,
भाकरी फिरवू लागला।
सत्तेच्या पोळीसाठी,
पुतण्या मिरवू लागला।।
ठाकरे, मुंडे नंतर आता,
पवारही भांडतील का?
सत्तेसाठी घरगुती वाद,
चव्हाट्यावर मांडतील का?
- विजय गायकवाड